# महाराष्ट्राच्या लाडक्या दादांना अखेरचा निरोप : कर्मभूमीत अजित पवारांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २९ जानेवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## अजित पवार पंचत्वात विलीन : बारामतीतील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार, दोन्ही मुलांनी दिला मुखाग्नी

**विदर्भ प्राजस्टक**
**दि.२९ बारामती**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर आज दुपारी १२:१५ वाजता बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर शोकाकुल वातावरणात आणि शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. महाराष्ट्राच्या राजकारणातील एका झंझावाती पर्वाचा आज अंत झाला. त्यांचे सुपुत्र पार्थ आणि जय पवार यांनी आपल्या वडिलांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला, तेव्हा उपस्थित असलेल्या हजारो समर्थकांचे आणि कार्यकर्त्यांचे डोळे पाणावले होते.

महाराष्ट्र पोलिस दलातर्फे हवेत फैरी झाडून आणि बिगुल वाजवून अजित पवारांना अखेरची मानवंदना देण्यात आली. अजितदादांना निरोप देण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजप अध्यक्ष नितीन नवीन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संपूर्ण मंत्रिमंडळांसह सर्वच पक्षांचे नेते उपस्थित होते.

त्याआधी, अंत्ययात्रेत हजारो लोक उपस्थित होते. बारामतीचे रस्ते जाम झाले होते. गुरुवारी सकाळी अजित पवार यांचे पार्थिव त्यांच्या काटेवाडी येथील निवासस्थानी नेण्यात आले होते.







उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा बारामतीत लँडिंग करताना अपघात झाला. त्यात अजित पवार यांच्यासह विमानातील सर्व पाच जणांचा मृत्यू झाला. अजित पवार या 'लोकनेत्या'च्या मृत्यूनं महाराष्ट्रावर शोककळा पसरली. देशभरातून विविध नेते तसेच राजकीय लोकांकडून अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली जात आहे. बारामतीतील विद्या प्रतिष्ठान इथं अजित पवार यांच्या पार्थिवावर आज शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. अहिल्यानगर (तत्कालीन अहमदनगर) मध्ये जन्मलेल्या अजित पवार यांची कर्मभूमी म्हणजे बारामती. तिथूनच ते पहाटे कामाची सुरुवात करत. बारामतीतल्या काटेवाडीत अजित पवार यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

अजित पवार यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात ठेवण्यात आलं. लाडक्या दादाच्या अंत्यदर्शनासाठी राज्यभरातून कार्यकर्ते काटेवाडी इथं दाखल झाले आहेत. देशाचे गृहमंत्री अमित शाह हेसुद्धा अजित पवार यांच्या अंत्यदर्शनासाठी बारामतीच्या काटेवाडीत दाखल झाले होते .

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं पार्थिव आज सकाळी अंत्यदर्शनासाठी बारामतीमध्ये असलेल्या काटेवाडी येथील त्यांच्या निवासस्थानी ठेवण्यात आलं होतं. त्यानंतर दादांचं पार्थिव विद्या प्रतिष्ठानच्या मैदानाकडं नेण्यात आलं. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी ९ वाजेपर्यंत पार्थिव काटेवाडीमध्ये ठेवण्यात आलं. त्यानंतर अँब्युलन्सनं पार्थिव ग. दि. मा. संभागृहापर्यंत नेण्यात आलं. सकाळी ११ वाजता अजित पवार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार होते. मात्र त्यांच्या चाहत्यांचा आक्रोश आणि मान्यवरांच्या उपस्थितीनं अंत्यसंस्काराला उशीर झाला.आज पहाटेपासूनच काटेवाडी तसेच राज्यभरातील कार्यकर्ते अजित पवार यांच्या निवासस्थानी त्यांच्या अंत्यदर्शनासाठी दाखल झाले. यावेळी सुप्रिया सुळे तसेच भाऊ श्रीनिवास पाटील, पुतणे योगेंद्र पवारदेखील या ठिकाणी दाखल झाले.

बारामती येथे बुधवारी सकाळी ८.४६ वाजता झालेल्या भीषण विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार (६६ वर्षे ६ महिने ६ दिवस) यांचे निधन झाले. त्यांच्यासोबत वैमानिक सुमीत कपूर, सहवैमानिक शांभवी पाठक, अंगरक्षक विदीप जाधव आणि फ्लाइट अटेंडंट पिंकी यादव होते. त्यातील एकही जण वाचू शकला नाही.

## अजित पवार अनंतात विलिन : पार्थिवाचं दर्शन घेताना पवार कुटुंबीयांचा बांध सुटला

### अमित शाह, देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केल्या संवेदना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९बारामती**

महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बुधवारी विमान अपघातात करुण अंत झाला. लाडक्या दादांच्या अकाली जाण्यानं देशभरातील त्यांच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला. त्यांचं पार्थिव विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं. दादांच्या पार्थिवावर विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. दादांच्या अंत्यदर्शनाला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अभिनेता रितेश देशमुख यांच्यासह राज्य आणि देशभरातील अनेक बडे नेते आज बारामतीत दाखल झाले होते.




महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं पार्थिव विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात दाखल करण्यात आल्यानंतर उपस्थित जनसमुदायानं मोठा आक्रोश केला. यावेळी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. अंत्यदर्शन घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज ठाकरे, उद्धव ठाकरे, प्रफुल पटेल, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, चंद्रशेखर बावनकुळे, छगन भुजबळ,हसन मुश्रीफ, चंद्रकांत दादा पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, शाहू छत्रपती महाराज, आदी मान्यवर उपस्थित आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवाचं त्यांच्या कुटुंबीयांनी अंत्यदर्शन घेतलं. यावेळी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना आश्रू आवरणं कठीण झालं होत.

## अजितदादांनंतर सुनेत्रा पवार राज्याच्या उपमुख्यमंत्री करा

### मंत्री नरहरी झिरवळ यांनी केली मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९बारामती**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवाला गुरुवारी बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात मुखाग्नी देण्यात आला. अजित पवार यांचे बुधवारी बारामती येथे विमान अपघातात निधन झाले होते. आज त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी बारामती येथे हजारोंचा जनसागर लोटला होता. या सगळ्यांनी साश्रू नयनांनी अजित पवार यांचा अखेरचा निरोप दिला. अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार आणि जय पवार या दोघांनी अजित पवार यांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री नरहरी झिरवळ यांनी एक मोठी मागणी केली आहे. अजित पवार यांच्यानंतर सुनेत्रा पवार यांना राज्याचे उपमुख्यमंत्रीपद देण्यात यावे, अशी अप्रत्यक्ष मागणी नरहरी झिरवळ यांनी केली आहे.




सगळ्यांची मागणी होतेय की, सुनेत्रा वहिनींना मंत्रिमंडळात आणावं. अशी सगळ्यांची प्रामाणिक इच्छा आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्याच आहेत. आता वेगळं राहून चालणार नाही, एकत्रच राहावं लागणार आहे, असे झिरवळ यांनी म्हटले. नरहरी झिरवळ यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे.

अजित पवार हे राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री होते. तसेच ते बारामती विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर या सर्व जागा कोण भरुन काढणार, हा प्रश्न साहजिकच उपस्थित झाला होता. आज अजित पवार यांच्या अंत्यविधीवेळी पार्थ पवार आणि जय पवार हे दोघे सर्व पाहुण्यांच्या भेटीगाठी घेत होते. अंत्यविधीच्या ठिकाणी हे दोघेच उभे होते. राष्ट्रवादीचे इतर नेते आणि इतर पवार कुटुंबीय खालीच बसून होते. त्यामुळे पार्थ पवार आणि जय पवार हे दोघेच अजितदादांचे राजकीय वारसदार असतील, हे अधोरेखित झाले होते. यानंतर आता लगेचच नरहरी झिरवळ यांनी सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री करण्याची मागणी केल्याने राजकीय वर्तुळाच्या भुवया उंचावल्या गेल्या आहेत.

पवार कुटुंबीय हे राजकारणात कायम प्रॅक्टिकल राहिले आहे. परिस्थितीची गरज आणि आगामी राजकारणाची दिशा ओळखून पावले उचलण्यात पवार कुटुंबीय वाकबगार आहेत. त्यामुळे एका बाजूला अजित पवार यांच्या जाण्याचे दु:ख असले तरी त्यांच्या माघारी निर्नायकी परिस्थितीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात गोंधळ निर्माण होऊ नये, यासाठी आता हालचाली सुरु झाल्या आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सूत्रे कोणाच्या हातात जाणार आणि उपमुख्यमंत्रीपदाबाबत काय निर्णय घेतला जाणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

## मोदी-फडणवीसांनी अजित पवारांवरील आरोप मागे घ्यावे

### संजय राऊत यांचा भाजपवर थेट हल्ला; भाजपच्या जाहिरातीवरुन वाद पेटला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मुंबई**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी विमान अपघातातील निधनानंतर देशभरातून शोक व्यक्त केला जात असतानाच, भाजपकडून देण्यात आलेल्या पानभर श्रद्धांजली जाहिरातींवरून नवा राजकीय वाद उफाळून आला आहे. उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार टीका करत, जाहिराती देणे ही श्रद्धांजली नाही, तर अजित पवारांवर लावलेले ७० हजार कोटींचे आरोप मागे घेणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल, असा थेट हल्लाबोल केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही राऊत यांनी यावेळी स्पष्ट सल्ला दिला आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात शोककळा पसरली असली, तरी त्याचवेळी आरोप-प्रत्यारोपांचाही नवा अध्याय सुरू झाला आहे. भारतीय जनता पक्षाने अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी विविध वर्तमानपत्रांमध्ये पानभर जाहिराती प्रसिद्ध केल्या. या जाहिरातींमधून अजित पवार यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. मात्र, या जाहिरातींवरूनच आता राजकीय टीकेची धार अधिक तीव्र होताना दिसत आहे. शिवसेना (उद्धव ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी या जाहिरातींवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत भाजपच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला आहे.

संजय राऊत यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत भाजपवर जोरदार टीका केली. भाजपने कमाल केली आहे. दादांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी पानभर जाहिराती दिल्या. पण त्याने काय होणार? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यांच्या मते, केवळ जाहिराती देऊन सहानुभूती दाखवणे हा श्रद्धांजलीचा खरा अर्थ नाही. अजित पवार यांच्या जिवंतपणी त्यांच्यावर गंभीर आर्थिक आरोप करणाऱ्यांनी आता अचानक श्रद्धांजली देणे हे राजकीय दुटप्पीपणाचे लक्षण असल्याचा आरोप राऊत यांनी केला.

राऊत यांनी आपल्या टीकेत प्रामुख्याने ७० हजार कोटींच्या कथित आरोपांचा मुद्दा उपस्थित केला. भाजप नेते, विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांच्यावर यापूर्वी ७० हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप केले होते, हे संपूर्ण महाराष्ट्राला माहीत आहे, असे राऊत म्हणाले. हे आरोप आजही अधिकृतरीत्या मागे घेण्यात आलेले नाहीत. अशा परिस्थितीत, त्याच नेत्यांनी अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांना थोर नेते म्हणून गौरवणे, हे केवळ राजकीय सोयीचे असल्याची टीका त्यांनी केली.

जर खरोखरच अजित पवार यांना श्रद्धांजली द्यायची असेल, तर पानभर जाहिराती देण्याऐवजी त्यांच्यावर लावलेले सर्व आरोप अधिकृतपणे मागे घ्या, असा स्पष्ट सल्ला संजय राऊत यांनी मोदी आणि फडणवीसांना दिला. आरोप मागे घेणे म्हणजे अजित पवार यांच्या प्रतिमेवरील डाग पुसण्यासारखे ठरेल आणि तीच खरी श्रद्धांजली असेल, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

## महाराष्ट्राच्या राजकारणात पोकळी निर्माण झाली, अमित शाहांनी घेतली शरद पवारांची भेट



**समाज आणि जनतेसाठी समर्पित अजित पवार जी यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणात एक अशी पोकळी निर्माण झाली आहे जी लवकर भरून निघणार नाही.**

## युजीसीच्या नव्या नियमांना सुप्रीम कोर्टाकडून स्थगिती सरन्यायाधीश म्हणाले, होऊ शकतो दुरुपयोग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नवी दिल्ली**

वादग्रस्त ठरलेल्या यूजीसीच्या नव्या नियमांना सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. नवे नियम हे अस्पष्ट असून, या नियमांचा दुरुपयोग होऊ शकतो, असे निरीक्षण सरन्यायाधीशांनी नोंदवले आहे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला नोटिस, बजावली असून, आता या प्रकरणाची पुढील सुनावणी ही १९ मार्च रोजी होणार आहे. यूजीसीने लागू केलेल्या नव्या नियमांमवरून देशभरात आणि विशेषकरून उत्तर भारतात संताप व्यक्त होत. होता तसेच या नियमांविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिकाही दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिला आहे.

यूजीसीच्या नव्या नियमांविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर आज सुनावणी झाली. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती ज्योमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीवेळी याचिकाकर्त्यांचे वकील विष्णू शंकर जैन यांनी सांगितले की, यूजीसीच्या नियमांमधील सेक्शन ३सी हे




जाती आधारित भेदभावाला केवळ एससी, एसटी आणि ओबीसींपर्यंतच मर्यादित करतं, तसेच सामान्य वर्गाला या तरतुदींच्या बाहेर ठेवतं. ही बाब कलम १४ मध्ये देण्यात आलेल्या समानतेच्या अधिकारांच्या विरोधाात आहे. तसेच ही व्याख्या घटनेची भावना आमि सर्वोच्च न्यायालयाच्या जुन्या आदेशांच्या विरोधात आहे. तसेच या नियमांमुळे समाजात वैमनस्य वाढेल, असा दावाही याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी केला.

त्यानंतर प्रकरणी सुनावणी करताना सरन्यायाधीशांनी स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षांनंतरही आपण समाजाला जातीपातींपासून मुक्त करू शकलेलो नाही. आता या कायद्यांमधून आपण समाजाला आणखी मागे घेऊन जात आहोत का? अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी केली.

दरम्यान, नव्या नियमांमुळे रॅगिंग वाढणार असून, रॅगिंकरणारे विद्यार्थी तक्रारही करतील, अशी भीती याचिकाकर्त्यांनी व्यक्त केली. त्यावर न्यायम्रूती बागची यांनी सांगितले की, राज्य घटना राज्याला एससी एसटींसाठी विशेष कायदे बनवण्याचा अधिकार देते. जर २०१२ च्या नियमांमध्ये व्यापक संरक्षण देण्याचा उल्लेख करण्यात आला असेल तर समाजिक न्यायाचं संरक्षण करणाऱ्या कायद्यांमध्ये बचावाचे उपायही असले पाहिजेत. अमेरिकेप्रमाणे शाळांनाच वेगळं करण्याच्या पातळीपर्यंत आपण जाता कामा नये, असेही न्यायमूर्तींनी स्पष्ट केले.

## संपादकीय ......

# सामान्य कार्यकर्त्यांचा आधारवड!

*राजकारणातील रोखठोक, कार्यतत्पर लोकनेता म्हणून लाखो नागरिकांचे अत्यंत जवळचे असणारे अजितदादा पवार यांचे अपघाती निधन अत्यंत क्लेशदायी आहे. राजकारणातील अनेक चढउतार आम्ही एकत्रितपणे पाहिले आणि दादांच्या खंद्या पाठिंब्यामुळे आलेल्या प्रत्येक आव्हानाचा निडरपणाने मुकाबला करत आलो आहोत. दादांविना राजकारण– समाजकारण ही कल्पनाच मनाला न पटणारी आहे. त्यांच्या जाण्यानं पोरकेपणाची भावना मनात निर्माण झाली आहे. मन विषण्ण करणारी दादांची एक्झिट आहे.*

*राजकारणातील काही नेते लोकप्रियतेवर, तर काही नेते निर्णय क्षमतेवर ओळखले जातात. अजितदादा हे दुसर्या गटातले नेते होते. कर्तृत्वावर त्यांचा विश्वास होता. भाषणांनी भावनिक लाट निर्माण करणारे ते नेते नव्हते. राज्य चालवण्याचा अनुभव, प्रशासनाची अचूक समज आणि वेळेवर निर्णय घेण्याची धाडसी हिंमत या गुणांमुळे ते लोकप्रिय होते. अजितदादा गेले, ही कल्पनाच मनाला करवेना!अजितदादांना मा. शरद पवार यांचा वारसदार म्हणून पाहिले गेले; पण माझ्या मते ते केवळ वारसदार नव्हते, तर राज्यकारभाराचे व्यवस्थापकसुद्धा होते. राज्यातील महत्त्वाचे अर्थ, जलसंपदा आणि उपमुख्यमंत्रिपदाच्या जबाबदारीचा वापर त्यांनी ग्रामीण भागातील विकासासाठी केला. आतापर्यंतचा त्यांचा स्वभाव आणि कामगिरी पाहिली, तर आपल्या खात्याचे कामकाज आणि निर्णयावर विश्वास ठेवणारा नेता ही त्यांची ओळख होती.*

*२०१९ मधील पहाटेचा शपथविधी आणि २०२३ मध्ये भाजपसोबत जाण्याचे त्यांचे निर्णय सोपे नव्हते. स्वतःच्या राजकीय भवितव्यापेक्षा त्यांनी सत्तेत स्थिरता आणि विकासाची गती राखण्यासाठीच त्यांनी हे निर्णय घेतले होते, असे मला वाटते. काळानुसार राजकारणाची गणितेही बदलतात. अजितदादांनी पक्ष आणि कार्यकर्त्यांच्या भविष्यासाठी वेगळा होण्याचा निर्णय घेतला होता. तो निर्णय सत्तेसाठी नव्हता, तर जनहिताचे निर्णय घेण्यासाठी त्यांनी सत्ता मार्ग निवडला होता. त्यांच्या धाडसी निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचा एक घटक सत्तेत सहभागी आहे. राजकारण हे केवळ नात्यांवर चालत नाही, तर कालानुरूप भूमिका बदलण्यावर चालत असते. अजितदादांनी तो बदल स्वीकारला आणि स्वतःची स्वतंत्र राजकीय दिशा ठरवली. धाडस आणि त्याची किंमत मोजण्याची हिंमत अजितदादांकडे होती.सिंचन, अर्थकारण, पायाभूत सुविधा या विषयांवर त्यांची पकड मजबूत होती, हे त्यांच्या निर्णयांवरून मला अनेकदा जाणवले. दादा संपूर्ण महाराष्ट्राचे होते. त्यांनी स्वतःला सीमित ठेवले नाही. पुणे आणि पिंपरी–चिंचवड महानगरपालिकांचा निवडणूक प्रचार करत असताना पक्षाच्या नेत्यांनी बोलविल्यानंतर ते बाजूच्या महानगरपालिका निवडणूक प्रचारलाही तातडीने गेले होते. राष्ट्रीय अध्यक्ष असल्यामुळे पक्षाच्या प्रदेश कार्यालयात त्यांचा वावर कमी होता; पण कोणत्याही जिल्ह्यात दौरा असला, तरी ते प्रदेश कार्यालयाच्या संपर्कात असत. महायुती सरकारमध्ये अजितदादा हे केवळ उपमुख्यमंत्री नव्हते, तर प्रशासन आणि राजकारण यांच्यातील ते दुवा होते. निवडणुकीत आपल्या पक्षाला अधिक जागा मिळाव्यात, ही नैसर्गिक भावना इतर राजकीय पक्षांच्या नेत्यांप्रमाणे त्यांच्याही मनात होती; पण पक्ष हितापेक्षाही त्यांनी स्थिर सरकारला महत्त्व दिले. अजितदादा हे स्वार्थाच्या राजकारणात कधी अडकले नाहीत. वास्तव स्वीकारणारे आणि निर्णय घेणारे ते नेते होते.*

*प्रशासनावर असलेली मजबूत पकड आणि कार्यक्षम निर्णय घेण्याची त्यांची क्षमता अतुलनीय होती. अजितदादांनी मागील चाळीस वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत राज्य सरकारमध्ये विविध विभागांच्या मंत्रिपदाची जबाबदारी सांभाळली. विशेषतः अर्थ आणि जलसंपदा खात्यांत अनेक महत्त्वाचे आणि जलद निर्णय घेतले. २०४७ पर्यंत महाराष्ट्राला विकसित राज्य करण्याच्या ध्येयापर्यंत पोहोचवण्यात अशा नेतृत्वाची नितांत गरज होती. दादांविषयी काय काय आणि किती बोलावे! त्यांच्या कार्याचा महासागर शब्दांमध्ये मावणारा नाही.*

*दूरदृष्टीपणा, स्पष्टवक्तेपणा, रोखठोक, मिश्कील, वक्तशीरपणा, शिस्त अशा अनेक गुणांचा समुच्चय म्हणजे दादा. त्यांच्या कामाची पद्धत थेट आणि स्पष्ट होती. वेळेवर निर्णय घेणे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे ही त्यांच्या कार्यशैलीची वैशिष्ट्ये होती. यामुळे त्यांना प्रशासकीय स्तरावर एक कार्यक्षम नेते म्हणून ओळखले जात होते. त्यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे दांडगा जनसंपर्क आणि प्रचंड शिस्तप्रियता. ते लोकांमध्ये मिसळत, त्यांच्या समस्या ऐकून घेत आणि त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करत. यामुळे लोकांना हा घरचा, हक्काचा दादा वाटायचा. दादांच्या संघटन कौशल्याचा मी मागील अनेक वर्षांचा साक्षीदार आहे. अनेक अवघड निर्णय घेतल्यानंतर ते सत्यात उतरवताना संघटनेवरील पकड मजबूत ठेवण्यात ते मातब्बर होते. त्यांच्या या गुणामुळे राष्ट्रवादी पक्ष पुन्हा भरारी घेताना दिसला. अलीकडील काळात दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येत असल्याने दादा सुखावले होते. बारामती लोकसभा मतदारसंघातून आणि नंतर बारामती विधानसभा मतदारसंघातून अनेकवेळा निवडून येणे, हे त्यांच्या स्थानिक पातळीवरील मजबूत पकडीचे द्योतक होते. सहकारी संस्था, साखर कारखाने, दूध संघ आणि बँकांमध्ये त्यांनी महत्त्वाची पदे भूषवली. ही सर्व पदे नागरिकांशी थेट संबंध निर्माण करून देणारी आहेत. किंबहुना ही पदे भूषवताना संबंधित सभासदांशी थेट संपर्क ठेवावा लागतो. यामुळे त्यांचा ग्रामीण आणि सहकारी क्षेत्रातील कार्यकर्त्यांशी आणि लोकांशी जवळचा संबंध राहिला. यातूनच त्यांना कार्यकर्त्यांचे मोठे जाळे उभे करता आले आहे.*

*राजकीय यश आणि परखडपणा या तशा एकमेकांशी विसंगत वाटणार्या बाबी; पण अजितदादा हे स्पष्टवक्तेपणासाठी ओळखले जात. ते आपले विचार थेटपणे मांडत आणि निर्णय घेण्यास कचरत नसत. हा थेटपणा त्यांच्या कार्यकर्त्यांना आणि जनतेलाही आकर्षित करायचा. वक्तशीरपणा आणि कामाचा वेग याबाबत दादांनी घालून दिलेला आदर्श पुढील अनेक पिढ्यांसाठी दीपस्तंभासारखा राहील. पुणे आणि पिंपरी–चिंचवड परिसरात त्यांनी उद्योगपूरक वातावरण निर्माण करण्यासाठी अनेक प्रयत्न केले. कौशल्य विकास केंद्रांच्या उभारणीतही ते सक्रिय राहिले. सरकारी योजनांची अंमलबजावणी आणि विकासकामांना प्राधान्य देणे हे त्यांची कार्यपद्धती होती. ते केवळ घोषणा करण्याऐवजी प्रत्यक्ष कामे पूर्ण करण्यावर भर देत. उपमुख्यमंत्री म्हणून ते राज्याच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीचा विचार करून वास्तववादी निर्णय घेत असत. दादा नेहमीच राज्याच्या आर्थिक स्थितीबद्दल स्पष्टपणे बोलताना दिसून आले. उपमुख्यमंत्रिपदावर असतानाही त्यांचा स्पष्टवक्तेपणा कायम राहिला. सरकारच्या धोरणांबद्दल किंवा विरोधकांच्या टीकेला ते थेट उत्तरे देत. उगाचच बाष्कळ बडबड करणे किंवा मतांच्या आकर्षणासाठी लांगुलचालन करणे दादांना कधीच जमले नाही. जे आहे ते स्पष्टपणाने मांडणे, हा दादांचा स्वभावपिंड होता. असा लोकनेता पुन्हा होणे दुर्मीळ आहे. दादांचा वियोग ही आयुष्यातील सर्वांत मोठी हानी आहे. कधीही न भरून येणारी..! त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!*

# सच्चा मित्र आणि सहकारी




अजितदादा पवार यांचे असे विमान अपघातात जाणे केवळ आम्हालाच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राला आणि देशाला धक्का आहे.अजितदादा आणि माझा तीसहून अधिक वर्षांचा स्नेह. मी, दिलीपराव वळसे–पाटील, आर. आर. आबा, अजितदादा असे आम्ही सर्व एकाच वेळी विधानसभेत आमदार म्हणून आलो आणि त्यामुळेच प्रदीर्घ काळ सोबत काम करता आले. अजितदादांची काम करण्याची पद्धत मी फार जवळून अनुभवली. ते खर्या अर्थाने तळागळातून आलेले नेते यासाठी होते की, त्यांनी शेतीतील भाजीपाला विकणे इथपासून ते संस्था सांभाळणे, आमदार, मंत्री, उपमुख्यमंत्री अशा सार्या जबाबदार्या यशस्वीपणे पार पाडल्या. ते पवारसाहेबांचे पुतणे असले, तरी कार्यकर्ता ते राज्याचा उपमुख्यमंत्री असा त्यांचा प्रवास होता. अजितदादा १६ वर्षे पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष होते. त्या काळात पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या ठेवी ३०० कोटींहून १ लाख ६० हजार कोटींपर्यंत पोहोचल्या. अत्यंत सक्षमपणे त्यांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक सांभाळल्याने त्यांना आदरणीय साहेबांनी लोकसभेवर जाण्याची संधी दिली आणि ते प्रचंड मताधिक्याने लोकसभेवर निवडून गेले.

बहुधा अजितदादांच्या खमक्या स्वभावाला लोकसभा रुचली नसावी की काय, ते लगेच महाराष्ट्राच्या विधिमंडळात परतले. सुधाकरराव नाईक यांनी अजितदादांच्या कामांचा झपाटा बघून त्यांची कृषी आणि ऊर्जा खात्याचे राज्यमंत्री म्हणून निवड केली. त्यानंतर पवार साहेबांच्या मंत्रिमंडळातही अजितदादांनी उत्तम कामगिरी बजावली. १९९५ ते १९९९ या काळात आम्ही सर्वजण विरोधी पक्षात होतो. त्यावेळी मी, दादा, आबा, दिलीपराव असे एकत्र विधानसभेत बसायचो. पत्रकारांनी त्यावेळी आम्ही सभागृहात बसायचो त्या जागेला 'अशांत टापू' असे नाव दिले होते.

आम्ही विरोधी पक्षात असताना सरकारच्या चुकीच्या धोरणांवर अक्षरशः तुटून पडत असू. १९९९ मध्ये आम्ही एकाच वेळी कॅबिनेट मंत्री झालो. माझ्याकडे अर्थ खाते होते. अजितदादांकडे जलसंपदा खात्याची जबाबदारी होती. पुढे १५ वर्षे सत्तेत असताना आणि नंतरही महाविकास आघाडीच्या काळात आणि आता पुन्हा उपमुख्यमंत्री म्हणून जी–जी खाती अजितदादांना मिळाली त्यात त्यांनी अत्यंत समरस होऊन काम केले. मंत्रिमंडळ बैठकीत दादा जनतेच्या भूमिका अत्यंत ताकदीने मांडत.

प्रशासनावरील पकड पुणे, पिंपरी–चिंचवड शहर व बारामती तालुक्याच्या विकासात त्यांचे असलेले योगदान हे अत्यंत वाखाणण्याजोगे आहे. सार्वजनिक जीवनात इतकी वर्षे वावरल्यानंतरही अजितदादा व्यसनांपासून लांब होते. पक्षाच्या कार्यकर्त्यांनाही ते व्यसनांपासून दूर राहण्याची सक्त ताकीद देत असत. सकाळी सात वाजल्यापासून कामाला लागणे, कामात शिस्त बाळगणे व दिलेला शब्द पाळणे ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती. अनेकदा वरवर जरी ते कडक स्वभावाचे वाटत असले, तरी आतून ते मृदू आणि हळव्या स्वभावाचे होते. अजितदादांनी साठी पार केली यावर विश्वासच बसत नाही, इतके ते तरुण आणि उत्साही वाटत होते. जीवनातील सर्व आव्हानांना तोंड देण्याची अजितदादांमध्ये क्षमता होती. राज्याच्या राजकारणात अजून मोठी भूमिका ते पार पाडतील, असा आम्हाला विश्वास असताना नियतीने त्यांना अशाप्रकारे हिरावून नेले आहे. दादांच्या जाण्याने मी एक सच्चा मित्र आणि सहकारी गमावला. माझ्या जीवनात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

**– आ. जयंत पाटील**




## चिकनप्रेमींनो सावधान! चिकनचा 'हा' भाग खाल्ला तर वाढेल हृदयविकाराचा धोका

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक**

चिकन हा आजच्या काळात सर्वाधिक खाल्ला जाणारा मांसाहारी पदार्थ मानला जातो. जिम करणारे तरुण असोत, वजन कमी करणारे असोत किंवा सुट्टीच्या दिवशी खास बेत करणारी कुटुंबे असोत, चिकन जवळपास प्रत्येकाच्या आवडीचं आहे. प्रथिनांनी समृद्ध असल्यामुळे चिकन आरोग्यासाठी चांगलं मानलं जातं. मात्र, चिकनचे सर्वच भाग शरीरासाठी तितकेच सुरक्षित असतात, असं नाही.




अनेकांना माहिती नसते की चिकनच्या काही विशिष्ट भागांमध्ये जास्त प्रमाणात चरबी, घातक घटक आणि सूक्ष्मजंतू असू शकतात. हे भाग नियमित खाल्ले गेले, तर हळूहळू शरीरावर त्याचे दुष्परिणाम दिसू लागतात. विशेषतः हृदय, पचनसंस्था आणि एकूण आरोग्यावर त्याचा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे चिकन खाताना कोणते भाग टाळावेत, हे जाणून घेणं गरजेचं आहे.

चिकनचे फुफ्फुस का धोकादायक ठरतात?

चिकनच्या शरीरातील सर्वात संवेदनशील भागांपैकी एक म्हणजे फुफ्फुस. या भागात काही प्रकारचे जिवाणू आढळतात, जे खूप वेळ शिजवल्यानंतरही पूर्णपणे नष्ट होत नाहीत. हे जिवाणू शरीरात गेल्यास पोटदुखी, जुलाब, संसर्ग आणि अशक्तपणा यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे चिकन स्वच्छ करताना किंवा शिजवताना फुफ्फुसांचा भाग काढून टाकणं अधिक सुरक्षित ठरतं.

चिकनची मान खाणं कितपत योग्य?

अनेक जण चवीसाठी चिकनची मान खातात. मात्र, मानेच्या भागात शरीरातील घातक द्रव्ये साठवणाऱ्या ग्रंथी असतात. याच भागात कोंबडीला दिल्या जाणाऱ्या औषधांचे किंवा इंजेक्शनचे अंश राहण्याची शक्यता जास्त असते. दीर्घकाळ हा भाग खाल्ल्यास शरीरातील हार्मोन्सच्या संतुलनावर परिणाम होऊ शकतो.

चिकनचे पाय आरोग्यासाठी का टाळावेत?

चिकनचे पाय थेट जमिनीच्या संपर्कात येतात. त्यामुळे त्यावर जंतुसंसर्ग होण्याची शक्यता अधिक असते. कितीही स्वच्छता केली तरी काही सूक्ष्मजंतू राहू शकतात. शिवाय या भागात चरबीचं प्रमाण तुलनेने जास्त असल्यामुळे कोलेस्ट्रॉल वाढण्याचा धोका निर्माण होतो.

चिकनची शेपटी म्हणजे चरबीचा साठा

चिकनच्या शेपटीच्या भागात मोठ्या प्रमाणात फॅट आणि ग्रंथी असतात. हा भाग नियमित खाल्ल्यास शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉल वाढू शकतं. हृदयविकार, लठ्ठपणा किंवा रक्तदाबाचा त्रास असणाऱ्यांसाठी हा भाग विशेषतः अपायकारक ठरू शकतो.

लिव्हर खाताना घ्यावी लागणारी काळजी

चिकन लिव्हरमध्ये काही पोषक घटक असले तरी तो शरीरातील विषारी द्रव्ये गाळण्याचं काम करतो. जर कोंबडीला जास्त प्रमाणात औषधे किंवा रसायने दिली गेली असतील, तर त्याचे अंश लिव्हरमध्ये साचलेले असू शकतात. त्यामुळे लिव्हर वारंवार आणि जास्त प्रमाणात खाणं टाळणं योग्य ठरतं.

चिकन खाताना लक्षात ठेवा या गोष्टी

चिकन नेहमी स्वच्छ पाण्यात नीट धुवून घ्यावं. शक्य असल्यास मीठ आणि हळदीचं पाणी वापरावं. चिकन पूर्णपणे शिजलेलं असणं अत्यंत महत्त्वाचं आहे. अर्धवट शिजलेलं चिकन खाल्ल्यास पचनाचे विकार होऊ शकतात. तेलकट आणि जास्त मसालेदार पदार्थांऐवजी साध्या पद्धतीने शिजवलेलं चिकन अधिक फायदेशीर ठरतं.

# फेब्रुवारीतील डाळिंब पिकाच्या आंबिया बहरातील पीक नियमन कसे करावे? वाचा सविस्तर

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक**

डाळिंब पिकाच्या बाबतील फेब्रुवारी महिन्यात (अंबिया बहार) पिक नियमन करणे महत्वाचे आहे. सध्या डाळिंब पीक नवीन पालवी फुटण्याची अवस्थेत असून या काळात विशेष काळजी घ्यावी लागते.




**डाळिंब – आंबिया बहार (फेब्रुवारी पिक नियमन)**

कीड व्यवस्थापन

नवीन पालवी फुटण्याची अवस्था

पहिले पाणी दिल्यानंतर १० ते १५ दिवसांनी निळे किंवा पिवळे चिकट सापळे २५ ते ३० सापळे प्रती एकर याप्रमाणे झाडाच्या सर्वात उंच फांदीपासून १० ते १५ सें.मी. खाली बांधवे. हे सापळे चिकटलेल्या किडीनुसार २० ते २५ दिवसांनी बदलावेत.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**वाढीची अवस्था**

झाडिरॅक्टिन / कडुनिंब तेल १% (१० हजार पीपीएम) ३ मिली किंवा करंज तेल ३ मिली किंवा वरील दोन्ही तेलांचे मिश्रण प्रत्येकी ३ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे आवश्यकतेनुसार ७ ते १० दिवसांच्या अंतराने एक–दोन फवारण्या घ्याव्यात.

**फुलधारणा / फुलकळी येण्याची अवस्था**

७ ते १० दिवसांच्या अंतराने सायअँट्रानिलीप्रोल (१०.२६ ओडी) ०.९ मिली किंवा क्लोर अँट्रानिलीप्रोल (१८.५ थायक्लोप्रिड (४८० एससी) ०.५ मिली अधिक स्टीकर स्प्रेडर ०.२५ एससी) ०.३ मिली किंवा फ्लुबेन्डीमाइड मिली लिटर पाणी याप्रमाणे एक–दोन फवारण्या घ्याव्यात.

– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी.

# लॉकरमध्ये दागिने ठेवा, पण 'या' वस्तूंना सक्त मनाई!

## RBI ने बदलले नियम; अन्यथा होईल कारवाई

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक**

तुम्ही देखील एखाद्या बँकेचे लॉकर भाड्याने घेतले असेल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे. दागिने आणि मौल्यवान कागदपत्रे सुरक्षित ठेवण्यासाठी बँक लॉकर हा सर्वात विश्वासार्ह पर्याय मानला जातो. मात्र, अलीकडच्या काळात भारतीय रिझर्व्ह बँकेने लॉकरच्या नियमांमध्ये मोठे बदल केले आहेत. आता ग्राहकांना केवळ लॉकर भाड्याने घेऊन चालणार नाही, तर सुधारित लॉकर कराराचे पालन करणे आणि त्यात काय ठेवावे किंवा काय ठेवू नये, याबद्दलच्या नियमांची माहिती असणे अनिवार्य आहे.

**लॉकरमध्ये नेमके काय ठेवावे?**

आरबीआयच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, लॉकरचा वापर केवळ कायदेशीर आणि पूर्वनिर्धारित कारणांसाठीच करता येतो.

दागिने: सोन्या–चांदीचे दागिने आणि हिरे.

दस्तावेज : मालमत्तेची कागदपत्रे, कर्जाचे दस्तऐवज, विमा पॉलिसी, बचत रोखे. **प्रमाणपत्रे :** जन्म दाखला, विवाह नोंदणी प्रमाणपत्र आणि इतर गोपनीय कागदपत्रे.




**बँक लॉकरमध्ये 'हे' ठेवण्यास सक्त मनाई!–** बँक लॉकरमध्ये रोख रक्कम किंवा चलन ठेवता येत नाही. शस्त्रे, दारूगोळा, स्फोटके किंवा किरणोत्सर्गी पदार्थ. ड्रग्ज, अमली पदार्थ किंवा तस्करीचे सामान.

**नाशवंत वस्तू लॉकरमध्ये ठेवण्यास मनाई आहे.**

**लॉकरचे भाडे थकवले तर काय होईल?–** जर एखाद्या ग्राहकाने सलग तीन वर्षे लॉकरचे भाडे भरले नाही, तर बँकेला तो लॉकर तोडून उघडण्याचा कायदेशीर अधिकार आहे. मात्र, ही प्रक्रिया अत्यंत पारदर्शक असणे बंधनकारक आहे. लॉकर उघडल्यानंतर त्यातील सामानाची सविस्तर यादी बँक तयार करते. ही संपूर्ण प्रक्रिया अधिकृत साक्षीदारांच्या उपस्थितीत पार पडते. लॉकरमधील साहित्य ग्राहकाकडे सोपवताना त्या यादीवर ग्राहकाची लेखी स्वाक्षरी घेतली जाते, जेणेकरून भविष्यात कोणताही वाद निर्माण होऊ नये.

# डॉ. कीर्ती पिंजरकर यांच्या 'कौटिल्यप्रणीत सुशासन आणि प्रशासन तंत्र' ग्रंथाचा अमरावतीत दिमाखदार प्रकाशन सोहळा

## साहित्य आणि प्रशासन क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांची उपस्थिती ; कौटिल्याचे विचार आजही सुसंगत असल्याचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ अमरावती,** श्री हरिचंद्र हॉटेलमध्ये शनिवार, २४ जानेवारी रोजी डॉ. कीर्ती राम पिंजरकर लिखित आणि पद्मगंधा प्रकाशन, पुणे द्वारे प्रकाशित 'कौटिल्यप्रणीत सुशासन आणि प्रशासन तंत्र' या महत्त्वपूर्ण ग्रंथाचा प्रकाशन सोहळा अत्यंत उत्साहात आणि साहित्य क्षेत्रातील मान्यवरांच्या मांदियाळीत पार पडला. इ.स. पूर्व चवथ्या शतकात कौटिल्याने मांडलेले नैतिकता व सचोटीचे विचार आजही सुसंगत असल्याचे प्रतिपादन उद्घाटक तथा माजी पोलीस महासंचालक डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांनी प्रकाशन सोहळ्यात व्यक्त केले.

**मान्यवरांची उपस्थिती**या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी पोलीस महासंचालक डॉ. भूषणकुमार उपाध्याय होते. विशेष अतिथी म्हणून रिद्धपूर मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावंकर, लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई उपस्थित होते. प्रमुख वक्ते म्हणून संस्कृत व भारतीय इतिहासाचे गाढे अभ्यासक प्रा. हेमंत राजोपाध्ये यांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर पद्मगंधा प्रकाशनचे अभिषेक जाखडे आणि सिद्धार्थ प्रकाशनचे शिवाजी धुरी यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

**कौटिल्य : केवळ इतिहास नव्हे, तर भविष्याचा मार्ग** कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. भूषणकुमार



उपाध्याय यांनी आपल्या भाषणात कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील तत्त्वज्ञानावर प्रकाश टाकला. डॉ. कीर्ती पिंजरकर यांनी कौटिल्याच्या विचारांना आधुनिक संदर्भात मांडून प्रशासनासमोर एक नवा आदर्श ठेवला असल्याचे त्यांनी नमूद केले.प्रमुख वक्ते प्रा. हेमंत राजोपाध्ये यांनी ग्रंथाचे विश्लेषण करताना सांगितले की, कौटिल्याने केवळ राज्यव्यवस्थाच मांडली नाही, तर 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' या सूत्रावर आधारित समाजव्यवस्था निर्माण केली. या पुस्तकात भ्रष्टाचाराचे ४० प्रकार, आपत्ती व्यवस्थापन आणि अगदी तृतीयपंथीयांचा प्रशासनातील सहभाग यांसारख्या आधुनिकोत्तर विषयांवर केलेले विवेचन लेखिकेच्या सखोल अभ्यासाची पावती देते.

**ग्रंथाचे वेगळेपण**या ग्रंथात कौटिल्यकालीन प्रशासनातील अनेक धाडसी आणि प्रगत विषयांचा समावेश करण्यात आला आहे, जसे की: प्रशासन यंत्रणा: सनदी नोकरवर्गाची भरती, पदोन्नती, बदली आणि निवृत्तीवेतनाचे नियम. सामाजिक अधिकार: स्त्रियांचे आर्थिक अधिकार, गर्भपात, स्वेच्छामृत्यू आणि समलिंगी संबंधांबाबतचे तत्कालीन कायदे. आर्थिक शिस्त: भ्रष्टाचार निर्मूलन, कर प्रणाली आणि बनावट चलनावर नियंत्रण. लोककल्याण: आपत्ती व्यवस्थापन आणि शेती विकासासाठी राज्यकर्त्यांची कर्तव्ये.

**लेखिकेचा परिचय –**लेखिका डॉ. कीर्ती पिंजरकर या संस्कृत भाषेतील पीएचडीधारक असून त्या शहरातील आदर्श प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या अभ्यासपूर्ण ग्रंथामुळे संस्कृत साहित्यातील संशोधनाला नवी दिशा मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.कार्यक्रमाला शहरातील शैक्षणिक, साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशासनातील पारदर्शकता आणि राजधर्माची व्याप्ती समजून घेण्यासाठी हा ग्रंथ प्रत्येकाने वाचायला हवा, असे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २९ जानेवारी २०२६ शहर/ग्रामिण

# महावितरण अभियंत्याला ३५ हजारांची लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अंजनगाव सुर्जी** – अंजनगाव सुर्जी येथील महावितरण कंपनीच्या अभियंत्याने सामान्य नागरिकांना वीज चोरीच्या खोट्या आरोपांत अडकवून लुटणाऱ्या महावितरण चा भ्रष्ट कारभाराचा आणखी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.अंजनगाव सुर्जी येथील महावितरण कार्यालयातील सहाय्यक अभियंता अजय विलास चौधरी (वय ३३) याला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती यांनी ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडून गजाआड केले आहे.ही कारवाई दि.२८ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी करण्यात आली.



प्राप्त माहितीनुसार,आरोपी अभियंत्याने आपल्या विज वितरण कार्यालयातील कर्मचारांना सोबत घेऊन तक्रारदाराच्या घरातील वीज मीटरमध्ये छेडछाड करून वीज चोरीचा बनावट आरोप केला. गुन्हा दाखल करण्याची भीती दाखवत प्रकरण मिटवायचे असेल तर पैसे द्याअशी सरळ सरळ धमकी देण्यात आली. सुरुवातीला ४५ हजार रुपयांची मागणी करण्यात आली असून, तडजोडीनंतर ३५ हजार रुपये लाच घेण्यावर सौदा ठरवण्यात आला.

अभियंत्याच्या त्रासाला कंटाळून तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली.त्यानुसार सापळा रचण्यात आला आणि महावितरण कार्यालयातच लाचेची रक्कम स्वीकारताच आरोपीला रंगेहाथ अटक करण्यात आली.आरोपीकडून रोख रक्कम जप्त करण्यात आली असून अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या प्रकारामुळे महावितरणच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी,अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने स्पष्ट केले आहे की, शासकीय कामासाठी कोणतीही लाच मागणारा अधिकारी किंवा कर्मचारी कोणत्याही परिस्थितीत सुटणार नाही. नागरिकांनी निर्भयपणे तक्रार करावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

# फेस ॲप प्रणालीत मनपाचे ३२५ अधिकारी व कर्मचारी आढळले गैरहजर

## मनपा आयुक्तांकडून अनाधिकृत गैरहजेरीची नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि २९अमरावती–** महा पालिका आयुक्त सौम्या शर्मा यांनी २० जानेवारी रोजी संगणक विभागामार्फत फेस ॲप प्रणाली द्वारे कर्मचाऱ्यांचे उपस्थितीचा आढावा घेतला असता, त्यांना ३२५ अधिकारी, कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेमध्ये फेस ॲप द्वारे त्यांचे उपस्थितीची नोंद केली नसल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार या सर्व कर्मचाऱ्यांना विना वेतन का करण्यात येवू नये अशी नोटीस देण्यात आली आहे.महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक नियम १९७९ च्या नियम ३ मध्ये प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याने नेहमीच कर्तव्यपारायणता ठेऊन अशोभनीय ठरेल अशी कोणतीही गोष्ट करता कामा नये असा स्पष्टउल्लेख केलेला आहे. शासनाचे निर्देशानुसार चतुर्थ



श्रेणी कर्मचाऱ्यांना सकाळी ०९.३०वाजता आणि इतर अधिकारी, कर्मचारी यांनी सकाळी ९.४५ वाजता कार्यालयात उपस्थित राहून आधार प्रणाली अंतर्गत फेस ॲप द्वारे उपस्थितीचे प्रमाणीकरण करुन दैनंदिन हजेरीपत्रकावर स्वाक्षरी करणे हा त्यांचे कर्तव्याचा भाग आहे. याबाबत सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना वेळेवेळी सुचित करण्यात आलेले आहे.त्या अनुषंगाने अमरावती महानगरपालिकेतील कार्यरत सर्व कर्मचारी त्यांचे कार्यालयात वेळेवर उपस्थित राहुन कामकाज करतात किंवा नाही याबाबत मा. आयुक्त महोदया सौम्या शर्मा–चांडक यांनी मंगळवार दि. २० जानेवारी २०२६ रोजी संगणक विभागा मार्फत फेस ॲप प्रणाली द्वारे कर्मचाऱ्यांचे उपस्थितीचा आढावा घेतला असता त्यांना ३२५ अधिकारी, कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेमध्ये फेस ॲप द्वारे त्यांचे उपस्थितीची नोंद केली नसल्याचे आयुक्तांचे निदर्शनास आले.आयुक्तांनी त्वरीत संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांचे मंगळवार दि.२० जानेवारी २०२६ रोजी ची अनाधिकृत गैरहजेरी विनावेतन का करण्यात येऊ नये याबाबत कारणे दाखवा नोटीस बजाविण्याचे सामान्य प्रशासन विभागास आदेशित केले. त्यास अनुसरुन सामान्य प्रशासन विभागामार्फत संबंधित कर्मचा–यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

# ढगाळ वातावरणामुळे पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव अडचणीत वाढ

## कांदा, गहू, लसूण, चारा पिके रोगांच्या विळख्यात; बळिराजांच्या अडचणीत वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९नांदगाव खंडेश्वर–** नांदगाव खंडेश्वर तालुक्यात मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप हंगाम वाया गेला, तर गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ हवामानामुळे रब्बी पिकेही विविध रोर्गाच्या विळख्यात सापडली आहेत. उत्पादन खर्च वाढणार असून, उत्पन्न मात्र घटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. अतिवृष्टीमुळे सर्वत्र पाण्याची उपलब्धता असल्याने हजारो हेक्टर क्षेत्रावर रब्बी पिके डोलावत होती. अनुकूल वातावरण व मुबलक पाणी यामुळे सर्वच रब्बी हंगामातील पिके मोठ्या जोमात होती, मागील महिन्यात वातावरणात अचानक बदल झाला होता. वाढलेले धुके व ढगाळ हवामानामुळे पिकांना विविध रोगांनी ग्रासले होते. जोमात असलेली पिके रोगांच्या विळख्यात सापडल्याने बळिराजा चिंतेत पडला होता. महागड्या औषधांचीफवारणी व खतांचा वापर करून मागील महिन्यात पडलेल्या रोगांमधून पिकांना कसेबसे वाचवले गेले होते. परंतु गेल्या दोन दिवसांपासून संपूर्ण नांदगाव खंडेश्वर तालुक्यात ढगाळ वातावरण तयार झाल्याने शेतकऱ्यासमोर नवे संकट उभे ठाकले आहे. तालुक्यात सर्वदर अतिवृष्टी झाल्याने सर्व तलाव, बंधारे, नाले तुडुंब भरले होते. खरीप हंगामअतिवृष्टीने वाया गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला होता. खरीप हंगामाची भरपाई रब्बी हंगामात होईल या अपेक्षेवर शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने रब्बी पिकांची पेरणी केली होती. लाल कांद्याच्या सीझनमध्ये भाव गडगडलेले होते. त्यातच अतिवृष्टीमुळे उत्पादनात मोठी घट होणार असल्याचे चित्र आहे परंतु गावरान कांदा, गहू,हरभरा, लसूण, चारा पिके मोठ्या प्रमाणात घेण्यात आली.रब्बी हंगामात हरभरा व गव्हाच्या क्षेत्रात वाढ झाली आहे. त्याचबरोबर गावरान कांद्याची लागवडही मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहे. गुलाबी चंडी व पोषक वातावरणामुळे रब्बी हंगामातील सर्वच पिके



मोठ्या जोमात होती. परंतु ढगाळ हवामानाचा फटका सर्वच पिकांना बसला असून, विविध रोगांनी ग्रासले आहे. ढगाळ हवामानामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे ढग पसरले आहेत.

सद्यःस्थितीत गावरान कांदा, गहू, हरभरा, चारा पिके जोमात होती. मागील महिन्यात धुके, दव अन् ढगाळ वातावरणामुळे मोठा खर्च करून पिके वाचवली. परंतु पुन्हा डगाळ वातावरणामुळे सर्वच पिकांना विविध रोगांनी ग्रासले आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे हातात उत्पन्न मिळेपर्यंत शाश्वती नाही.

**– मोरेश्वर दिवटे बागायतदार शेतकरी,**

ढगाळ हवामानामुळे पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे. शेतकऱ्यांनी पाण्याचे योग्य व्यवस्थापन, तसेच कृषितज्ज्ञांच्या सल्ल्याने उच्च दर्जाची कीटकनाशके, बुरशीनाशक औषधांची फवारणी करावी.

**विकास पाटील तालुका कृषी अधिकारी, नांदगाव खंडेश्वर**

### पिकांवर पडलेले रोग!

गहू : मावा, तांबेरा, ज्वारी : चिकटा, मावा, हरभरा : घाटे अळी, मर, कांदा / लसूणः मावा, तुडतुडे, मर, करपा, डाऊनी, मकाः अमेरिकन लष्करी अळी, भाजीपाला टोमॅटो अळी, डाऊनी, भेंडी नागअळी, लाल कोळी, तसेच अळीचा प्रादुर्भाव, कोथिंबीर भुरीचा प्रादुर्भाव, वांगे : अळीचा प्रादुर्भाव, मेथी मावा, कोबी/फ्लॉवर अळीचा प्रादुर्भाव.–

# आंतरराज्यीय दुचाकी चोरांना अटकदहा दुचाकी जप्त

## स्थानीक गुन्हे शाखेची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती**,मोटर सायकल चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय चोरांना अटक करण्यात आली असून त्यांच्याजवळून चोरीच्या दहा दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. ग्रामीण पोलीसांच्या स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली आहे. स्थानीक गुन्हे शाखेने आरोपी व दुचाकी चोरटे चेतन अनिल पवार (२१, रा. खोमई ता. भैसदही जि. बैतुल म.प्र.) व राज धनराज मावस्कर (२०.रा. देडवाकुंड ता. भैसदही जि. बैतुल म.प्र.) या दोघांना अटक केली आहे.ग्रामीण पथकाला गोपनिय खबरमिळाली होती कि,



शिरजगाव तेकरजगाव रोडवर दोन इसम त्यांचेजवळ असलेली विनानंबर हिरोपेंशन प्रो मोटर सायकल कमीकिमतीत विक्री करीत आहे. आणीत्याचे जवळ मोटर सायकल बावतकागदपत्र नसल्याने मोटर सायकलमिळलेल्या माहीतीवरून पथकाने दोन संशयित इसमांना ताब्यात घेवुन त्यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी व त्यांचे नाव चेतन अनिल पवार राज धनराज मावस्कर असे सांगितले. त्यांना त्यांचे जवळ असलेल्या विना क्रमाकांच्या दुचाकी बाबत विचारणा करुन कागदपत्राचीमागणी केली असता त्यांनी मोटर सायकल स्वतःची असल्याचे सांगुन गाडीचे कोणतेही कागदपत्र सादर केले नाही. त्यांना विश्वासात घेवुन कौशल्याने सखोल विचारपुस केली असता त्यांनी दोघांनी मिळून सदर मोटर सायकल २० तारखेला बहिरम यात्रेमधुन चोरल्याचे सांगितले.आरोपी कडून ५ लाख ३० हजार रूपये किंमतीच्या एकुण १० मोटर सायकल जप्त करण्यात आल्या आहेत. दोन्ही आरोपींना पुढील तपासकामी शिरजगाव कसबा पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.ही कारवाई पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अपर अधिक्षक पंकज कुमावत यांचे मार्गदर्शनात स्थानीक गुन्हे शाखा निरीक्षक किरण वानखडे यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे सहा. पोलिस निरीक्षक सचिन पवार, पोलिस अंमलदार गजेंद्र ठाकरे, युवराज मानमोठे, रविंद्र वऱ्हाडे, सागर नाठे, शांताराम सोनोने, विकास अंजीकर चालक प्रशिक वानखडे यांनी केली आहे.

# शेतीच्या नुकसानीची दर महिन्यात पाहणी करावी–जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ अमरावती–**नांदगाव पेठ येथील रतन इंडियाच्या प्रकल्पामुळे शेतपिकाचे नुकसान होत असल्याची तक्रारी येत आहे. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी, यासाठी यानंतर आता दर महिन्यात शेतपिकांची पाहणी करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात आज रतन इंडिया पॉवर लिमीटेडमधील विविध प्रश्नांवर आज बैठक पार पडली. यावेळी आमदार राजेश वानखेडे, जिल्हा पोलिस अधिक्षक विशाल आनंद, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, जिल्हा खनीकर्म अधिकारी प्रणिता चापले यांच्यासह कंपनी अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी आशिष येरेकर म्हणाले, वीज प्रकल्पामुळे परिसरातील




शेतपिकांचे नुकसान होत आहे. या नुकसानीची भरपाई मिळावी, यासाठी कृषी विभागातर्फे दर महिन्यात पाहणी करण्यात येईल. सध्या कृषी विभागाने शेतकऱ्यांचे जेवढे नुकसान नोंदविले आहे, त्याची भरपाई देण्यात येईल. यात कोणतीही कपात करू दिली जाणार नाही. यासोबतच १६ जणांच्या अनुकंपा तत्वावरील नोकरीचा प्रश्नही विचार करण्यात यावा. यासाठी व्यवस्थापनासोबतच चर्चा करावी. वाघोली गावात राखेची धुळ येत असल्यामुळे यावर उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच गावाच्या स्थलांतरणाबाबत विचार करण्यात येईल.

प्रकल्पामध्ये विविध करणांनी आंदोलने होतात. ही आंदोलने शांततेच्या मार्गाने करण्यात यावी. तसेच काही समस्या निर्माण झाल्यास जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा. राखेच्या वाहतुकीमध्ये पारदर्शकता आणावी. वजन मोजण्यासाठी वे ब्रिजची व्यवस्था करण्यात यावी. प्रकल्पाशी संबंधीत व्यक्तींना त्रास होणार नाही, याची प्रकल्पाच्या व्यवस्थापनाने काळजी घ्यावी, असे आवाहन केले.

# उद्याला सायरन वाजवत महात्मा गांधी यांची पुण्यतिथी निमित्य शहिदांना श्रध्दांजली होणार अर्पण

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२९ अमरावती**



शुक्रवार दिनांक ३० जानेवारी,२०२६ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी आहे, हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात येतो. महानगरपालिकेच्या प्रांगणात सकाळी १०.५० वाजता मा.आयुक्त सौम्या शर्मा – चांडक भा.प्र.से. तसेच सन्माननीय सदस्य, अधिकारी, कर्मचारी शहिदांना दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करणार आहेत. ३० जानेवारी रोजी नागरीकांनी मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करण्याकरीता सुचना म्हणून महानगरपालिका सकाळी १०.५९ ते ११.०० वाजेपर्यंत मौन पाळण्याबाबत सायरन वाजविणार आहे. तसेच मौन सोडण्याकरीता पुन्हा ११.०२ ते ११.०३ ला सायरन वाजविणार आहे. सायरनची चाचणी गुरुवार दिनांक २९ जानेवारी,२०२६ रोजी सायंकाळी ७.०० ते ७.३० या दरम्यान घेणार आहे. असे मनपाचे प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविण्यात येत आहे.

# बापमाणसाच्या आठवणीने तिवसा गहिवरले

## भैय्यासाहेब ठाकूर यांच्या जयंतीनिमित्त आमदार यशोमती ठाकूर भावुक



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ गुरुकुंज मोझरी**

भैय्यासाहेबांनी मला परीसारखं नाजूक नाही, तर वाघिणीसारखं कणखर बनवलं. त्यांनी दिलेली संघर्षाची शिकवण आणि राष्ट्रसंतांच्या विचारांची शिदोरी हीच माझ्या आयुष्याची खरी संपत्ती आहे, अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त करताना राज्याच्या माजी मंत्री तथा आमदार ड. यशोमती ठाकूर अत्यंत भावुक झाल्या.स्वर्गीय भैय्यासाहेब ठाकूर यांच्या जयंतीनिमित्त आणि स्व. कुमार साहेब ठाकूर यांच्या पुण्यतिथीनिमित्त मोझरी येथे भव्य जिल्हास्तरीय भजन स्पर्धा व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

### २३९ रक्तदात्यांचे अनोखे अभिवादन

जयंतीच्या निमित्ताने आयोजित रक्तदान शिबिरामध्ये तब्बल २३९ तरुणांनी रक्तदान केले. डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती रुग्णालय आणि रोटरी क्लब रक्तपेढीच्या सहकार्याने हे शिबिर यशस्वी पार पडले. सोबतच जिल्हास्तरीय भजन स्पर्धेने संपूर्ण मोझरी परिसर भक्तिमय झाला होता.दिग्गजांची उपस्थितीया सोहळ्याला काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, शहराध्यक्ष बबलू शेखावत, खासदार बळवंत वानखडे, विलास इंगोले , मिलिंद चिमोटे , माजी आमदार वीरेंद्र जगताप, हरीभाऊ मोहोड, माजी जि.प.अध्यक्ष यवतमाळ प्रवीण देशमुख ,जयंतराव देशमुख, अमरावती बाजार समिती सभापती हरीश मोरे, कांचनमाला गावंडे ,तिवसा पंचायत समिती सभापती कल्पना दिवे, तिवसा नगर पंचायत अध्यक्षा प्रतिभाताई गौरखेडे, अंजली ठाकरे , वर्षा देशमुख ,दिलीप काळबांडे ,अभिजित बोके , अभय देशमुख, श्रीकांत बोंडे, रमेश काळे, वैभव वानखडे, रितेश पांडव , माजी सभापती शिल्पा हांडे,सुनीता अळसपुरे , अंजली ठाकरे , वर्षा देशमुख , सुरेश मेटकर , संदीप आमले, पूजा आमले , सेतू देशमुख , आसिफ तवक्कल, आशुतोष देशमुख, संजय चौधरी यांसह जिल्हाभरातील हजारो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



**अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली–** या कार्यक्रमादरम्यान महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना सर्व उपस्थितांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. राज्यासाठी झटणाऱ्या एका कार्यकर्त्याच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी यावेळी मान्यवरांनी आपल्या शोकसंवेदनेतून व्यक्त केली.

आठवणींचा उजाळा आणि संघर्षाचा वारसा*भैय्यासाहेबांच्या आठवणींना उजाळा देताना यशोमती ठाकूर म्हणाल्या की, भैय्यासाहेबांनी केवळ राजकारण नाही, तर समाजकारण कसे करावे याचा वस्तुपाठ घालून दिला.ज्याप्रमाणे वाघ आपल्या पिल्लाला शिकारीसाठी तयार करतो, तशीच कणखरता भैय्यासाहेबांनी माझ्यात रुजवली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि गाडगेबाबा यांच्या विचारांचा वारसा त्यांनी मला दिला, ज्यामुळे आज मी जनसेवेसाठी खंबीरपणे उभी आहे. असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.सध्याच्या सामाजिक परिस्थितीवर भाष्य करताना त्यांनी स्पष्ट केले की, आज देशात आणि जिल्ह्यात अंधश्रद्धा पसरवून वातावरण गढूळ केले जात आहे. आपणही धर्म मानतो, पण माणसाने सश्रद्ध असावे, अंधश्रद्धाळू नसावे. पुरोगामी महाराष्ट्रात सनातनी प्रवृत्तींचा वाढता प्रभाव चिंतेचा विषय असून, राष्ट्रसंतांच्या शिकवणीतूनच आपण या प्रवृत्तींना चोख उत्तर देऊ.

# घरफोड्याकडून १८ लाखांचे सोने जप्त

## दहा चोऱ्यांचा उलगडा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

शहरासह इतरही ठिकाणी घरफोड्या करुन पोलिसांना आव्हान देणाऱ्या एका अट्टल घरफोड्याला गुन्हे शाखेच्या पथकाने बुधवारी २८ जानेवारीला पकडले. त्याने शहरातील दहा चोरी, घरफोडीच्या गुन्ह्यांची कबुली पोलिसांना दिली. या चोरट्याकडून पोलिसांनी २० लाख ७३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. यामध्ये ११० ग्रॅमचे १८ लाख १५ हजारांचे सोने पोलिसांनी जप्त केले आहेत.

पंकज राजु गोंडाणे (२८, रा. चवरेनगर, अमरावती), सागर जनार्धन गोगटे (३०, रा. गांधीचौक, अमरावती) या दोघांना पोलिसांनी अटक केली. पंकज गोंडाणे हा चोऱ्या, घरफोडीच्या गुन्ह्यात सक्रिय असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यामुळे पोलिस त्याच्या मागावर होते. मात्र तो गुन्हे केल्यानंतर शहरात थांबत नव्हता. रात्री दरम्यान चोरी केली कि, तो शहर सोडून मुंबई, ठाणे, संभाजीनगर, भुसावळ, कल्याण शहरात जाऊन आश्रय घेत होता. त्यामुळे त्याला पकडणे पोलिसांसाठी अवघड झाले होते. दरम्यान २७ जानेवारीला रात्री पंकज गोंडाणे कल्याण येथून रेल्वेने नागपूरला जाणार आहे, ही माहिती गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण, एपीआय महेश इंगोले व त्यांच्या पथकाला मिळाली होती. या आधारे पीआय चव्हाण यांनी एपीआय इंगोले व त्यांच्या पथकाने पंकजला पकडण्यासाठी सूचना दिल्या . त्या आधारे पथक अमरावतीवरुन भुसावळला पोहोचले. पोलिसांनी पंकज गोंडाणे ज्या रेल्वेने प्रवास करत होता. त्या रेल्वेमध्ये जाऊन त्याचा शोध घेतला. त्यावेळी सुरूवातीला तो पोलिसांना दिसला नाही. पोलिसांनी भुसावळपासून रेल्वेचे डबे तपासले. बडनेरा रेल्वेस्थानकापासून नागपूरच्या दिशेने मालखेड येथे पंकज गोंडाणे एका आरक्षित डब्यात असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याची चौकशी केली असून, त्याने शहरात दहा घरफोड्यांची कबुली दिली. चोरीतील काही सोन्याचे दागिने त्याने त्याचा मित्र सागर गोगटेजवळ दिल्याचे सांगितले. त्यामुळे पोलिसांनी सागर गोगटेलाही ताब्यात घेतले. या दोघांकडून पोलिसांनी ११० ग्रॅम सोने १ लाख ९० हजारांची ५०० ग्रॅम चांदी, ६८ हजार असा २० लाख ७३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. अशी माहिती बुधवारी पत्रकार परिषदेत गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी दिली आहे.

### आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता

पंकज गोंडाणे याच्याकडून तुर्तास दहा गुन्हे उघड झाले आहे. तपासात त्याच्याकडून काही गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे. त्या दिशेने आमचा तपास सुरू आहे.

**संदीप चव्हाण, पीआय, प्रमुख गुन्हे शाखा.**

# अचलपूर चावल मंडीतील न्यू एम.के. स्वीट दुकानाला भीषण आग

### १२ ते १६ लाख रुपयांचे नुकसान, अग्निशमन दल व स्थानिक नागरिकांच्या मदतीने मोठा अनर्थ टळला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अचलपूर–** अचलपूर शहरातील चावल मंडी परिसरात असलेल्या न्यू एम.के. स्वीट या दुकानाला बुधवारी सकाळी सुमारे ९ वाजताच्या सुमारास अचानक भीषण आग लागली. या आगीत दुकानात साठवलेले साबण, सर्फ, चिप्स, बिस्किटे, कॉस्मेटिक साहित्य तसेच चॉकलेट पूर्णपणे जळून खाक झाले. या आगीत अंदाजे १२ ते १६ लाख रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे.न्यू एम.के. स्वीटचे मालक मुख्तार खान व सत्तार खान यांच्या दुकानातून अचानक धूर निघताना दिसताच परिसरात एकच खळबळ उडाली. परिसरातील व्यापारी व स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदतीस धाव घेत आग विझवण्याचा प्रयत्न केला तसेच अग्निशमन दलाला घटनेची माहिती दिली.माहिती मिळताच अग्निशमन दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी शर्तीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. आग वेळीच नियंत्रणात आणल्याने आजूबाजूच्या इतर दुकानांचे मोठे नुकसान टळले.या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, ही दिलासादायक बाब आहे. मात्र दुकानातील बहुतांश साहित्य जळून नष्ट झाले आहे. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे.या घटनेनंतर परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण असून नुकसानग्रस्त दुकानदारांनी प्रशासनाकडे मदतीची मागणी केली आहे.

# मेळघाटात वाघाचा कहर, चिमुकल्यांच्या डोळ्यांदेखत

## आदिवासी तरुणाचा फडशा फाडून बळी, प्रशासनावर संतापाची लाट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९धारणी–**

मेळघाटातील सुसर्दा वनपरिक्षेत्रात नरभक्षी पट्टेदार वाघाने आदिवासी तरुणाचा नरडीचा घोट घेतलेल्या भीषण घटनेनंतर संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. या घटनेनंतर माजी आमदार राजकुमार पटेल यांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला थेट अल्टिमेटम दिला आहे. नरबळी घेणाऱ्या वाघाला तात्काळ जेरबंद करा, मृतक कुटुंबातील एका सदस्याला शासकीय सेवेत सामावून घ्या आणि २५ लाख रुपयांची सानुग्रह मदत जाहीर करा. अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरून संघर्ष उभारू, असा ठाम, तडफदार पवित्रा त्यांनी घटनास्थळीच घेतला. प्रादेशिक मेळघाट वनवृत्तांतर्गत येणाऱ्या सुसर्दा वनपरिक्षेत्रातील वनखंड क्रमांक ११७३, पूर्व हिराबंबई बीट, येथे बुधवारी पहाटे ही अंगावर काटा आणणारी घटना उघडकीस आली. मृत तरुणाची ओळख सिताराम बन्सीलाल गुथऱ्या (वय ३५, रा. हिराबंबई, ता. धारणी) अशी झाली आहे. सुसर्दा हे जंगल प्रादेशिक मेळघाट वनवृत्तांर्गत येत असले तरी ते मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या घनदाट अरण्यालगत असल्याने या परिसरात हिंस्र मांसभक्षीय वन्यजीवांचा मोठा वावरआहे.धक्कादायक बाब म्हणजे, हिराबंबई परिसरात याच नरभक्षी वाघाने अवघ्या तीन दिवसांत गाय, बैल आणि म्हैस अशा तीन पाळीव प्राण्यांचा फडशा फाडून जीव घेतला होता. अखेर या नरभक्षी वाघाने ३५ वर्षीय सिताराम



बन्सीलाल गुथऱ्या ( राठिया) यांचा बळी घेतला.मृतक सिताराम हा त्यांच्या दोन लहान अपत्यांसह मंगळवारी दुपारी गाव शिवार सोडून जंगल अरण्यसीमेत दाखल झाला होता. दोन दिवसांपूर्वी बेपत्ता झालेल्या आपल्या पाळीव बैलाचा शोध घेत असतानाच अचानक मागून पट्टेदार वाघाने त्याच्यावर झडप घातली, फडशा फाडला आणि मृतदेह दुरवर ओढत नेला. मात्र नशीब बलवत्तर ठरल्याने दोन मुले अशी त्यांची अपत्ये थोडक्यात बचावली. त्यांच्या डोळ्यांदेखत घडलेल्या या घटनेने संपूर्ण परिसर सुन्न झाला आहे.

घटनेची माहिती मिळताच वनविभाग, पोलीस यंत्रणा व महसूल प्रशासन तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. वन व व्याघ्र विभागाची यंत्रणा रात्रीपासूनच तैनात होती. मात्र प्रशासनाच्या कारवाईवर स्थानिक नागरिकांचा प्रचंड रोष उसळला. आदिवासी वस्तीमध्ये भीती, संताप आणि असुरक्षिततेची भावना पसरली असून, जंगलावर अवलंबून असलेली कुटुंबे अक्षरशः जीव मुठीत धरून जगत आहेत. दरम्यान, माजी आमदार राजकुमार पटेल व त्यांचे चिरंजीव रोहित पटेल (सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती धारणी) हे आपल्या सहकाऱ्यांसह तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

ही केवळ एक घटना नाही, हा शासन आणि वनविभागाच्या निष्क्रियतेचा थेट परिणाम आहे. जर आज कठोर निर्णय घेतले नाहीत, तर उद्या आणखी निष्पापांचे प्राण जातील, असे ठणकावून सांगत पटेल यांनी प्रशासनावर गंभीर आरोप केले. त्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे घटनास्थळी काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. ग्रामस्थांनी रस्त्यावर उतरून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या. मात्र राजकुमार पटेल यांच्या मध्यस्थीमुळे अखेर परिस्थितीनियंत्रणात आली. यानंतर घटनास्थळी पंचनामा आटपून मृतदेह धारणी येथे आणण्यात आला. राजकुमार पटेल यांच्या उपस्थितीत उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर शववाहिकेद्वारे मृतदेह पैतृक गावी हिराबंबई येथे पाठवून शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार आटपून घेण्यात आले. दरम्यान, वनपरिक्षेत्र अधिकारी अंजना अशोक बनसोड यांच्या मार्फत तातडीची मदत म्हणून ५ लाख रुपयांची सानुग्रह रक्कम राजकुमार पटेल यांच्या हस्ते मृतक कुटुंबीयांना देण्यात आली. उर्वरित २० लाख रुपयांची मदत मृतकाची पत्नी राधा सिताराम गुथऱ्या यांच्या हाती धनादेशाद्वारे देण्यात येणार असल्याची माहिती वरिष्ठ वनअधिकाऱ्यांनी प्रसारमाध्यमांना दिली आहे.गंभीर बाब म्हणजे, मेळघाटात गेल्या दीड वर्षांत वन्यजीवांच्या हल्ल्यात तब्बल सात बळी गेले आहेत. हिराबंबई परिसरात घडलेली ही सलग दुसरी घटना असल्याने संपूर्ण मेळघाट हादरून गेला आहे. मानव व वन्यजीव संघर्ष दिवसेंदिवस अधिक तीव्र होत चालला असून, प्रशासनाची धोरणात्मक अपयश उघड झाले आहे. मेळघाट हे पर्यटनासाठी प्रसिद्ध असले तरी इथल्या मूळ रहिवाशांच्या जीवाला किंमत नाही का? आम्ही केवळ आश्वासनांवर समाधान मानणार नाही. ठोस कृती झाली नाही, तर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा कडक इशारा राजकुमार पटेल यांनी दिला आहे.मेळघाटसारख्या संवेदनशील व्याघ्र अधिवासात मानव व वन्यजीव यांच्यातील संघर्ष रोखण्यासाठी दीर्घकालीन, परिणामकारक, लोकाभिमुख व ठोस उपाययोजना तातडीने राबवणे ही केवळ गरज नव्हे, तर शासनाची नैतिक व प्रशासकीय जबाबदारी आहे. अन्यथा, निष्पाप आदिवासींचे प्राण घेणारा हा संघर्ष प्रशासनाच्या निष्क्रियतेवर कायमचा काळा डाग उमटवेल.

# नांदगाव खंडेश्वर येथील बसस्थानक परिसरात ट्रॅफिक सिग्नल बसवा

### त्रस्त नागरिकानी केली प्रशासनाकडे मागणी : सततच्या वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नांदगाव खंडेश्वर–**



नांदगाव खंडेश्वर येथील बसस्थानक परिसरात दिवसेंदिवस ट्रॅफिकची समस्या वाढत आहे. खेडे गावातून चाललेली दररोज तालुक्याच्या ठिकाणी आपल्या दैनंदिन कामकाज, आणि शिक्षण, नोकरी करीता येणाऱ्या नागरिकामुळे व वाढत्या वाहनांच्या संख्यान मुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतुकीची समस्या वाढली आहे. तसेच शहरातूनच राष्ट्रीय महामार्ग गेला असुन महामार्ग मुळे शहर दोन भागात विभागल्या कारणाने येथील बसस्थानक परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होणे ही नेहमीचीच समस्या झाकेली आहे. तसेच या परिसरातून यवतमाळ, अमरावती राज्य मार्ग सुद्धा गेलेला आहे, एकी कडे राष्ट्रीय महामार्ग लगत नवीन डेव्हलप कॉलनी, पेट्रोल पंप, बस स्टैंड, शासकीय रेस्ट हाऊस, सर्वच शासकीय कार्यालये, शहरात जाणारा रस्ता श्री खंडेश्वर संस्थान कडे आणि चांदूर रेल्वे कडे जाणारा रस्ता तसेच मुख्य बाजार पेठ कडे जाणारा रस्ता, आठवडी बाजार व ग्रामीण रुग्णालय कडे जाणारा रस्ता, तहसील कडे जाणारा रस्ता तर दुसरी कडे कृषी कार्यालय, शाळा महाविद्यालय, मार्केट, नवीन कॉलनी कडे जाणारा रस्ता मार्केट लाइन, कृषी उत्पन्न बाजार समिती, बस स्टँड, सहीत या रस्त्याने ग्रामीण भागात जाणारे रस्ते असून प्रत्येक ठिकाणी ये जा करण्या करीता वाहन चालकांना महामार्ग असल्या कारणाने जीव मुठीत घेऊन वाहन चालवावी लागतात. अश्या सर्व ठिकाणी वाहनाची रांग किंवा बेशिस्त वाहन चालक यांच्या मुळे सर्व सामान्य वाहन चालकांना त्रास होत आहे यामुळे नागरिकांना पायी चालणे सुध्दा कठीण झाले आहे. त्यामुळे या परिसरात कधीही लहान मोठा अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. ग्रामीण रुग्णालयात एखादा रुग्ण नेताना सुद्धा म्ब्युलन्स चालकांना मोठी कसरत करावी लागते यासर्व बाबीं कडे वाहतूक पोलीस सहीत पोलीस निरीक्षक यांनी लक्ष देण्याची गरज आहे कारण अनेक छोटे मोठे अपघात आतापर्यंत या परिसरात झाले आहेत. या परिसरात अनेक वाहन चालक या बेशिस्त व्यवस्थेमुळे त्रस्त आहेत.त्यामुळे जनतेच्या हिता साठी व वाहन चालकांच्या सुरक्षा संबंधी नांदगाव खंडेश्वर शहरात वाहतूक कोंडी सोडविण्या करीता बसस्थानक परिसरात वाहतूक सिग्नल असणे गरजेचे असल्याने मत त्रस्त नागरिकांची व्यक्त केले आहे. त्यामुळे या महत्वपूर्ण मागणीकडे ठाणेदार नगर पंचायत मुख्याधिकारी यांचेसह सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी लक्ष देण्याची गरज आहे. या परिसरात एखादी मोठी घटना घडण्यापूर्वी ही मागणी प्रशासनाच्या वतीने मंजूर करण्याची मागणी तालुक्यातील नागरिकांसह येथील युवा ग्रामीण पत्रकार संघाने प्रशासनाला निवेदन देऊन केली आहे.

बसस्थानक परिसरात सिग्नल बसविण्यासाठी निवेदन प्राप्त झाले असून यासंबंधित पोलिस विभाग आणि नगर पंचायत यांचासंयुक्तपणे शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. लवकरच त्यावर निर्णय घेतला जाणार आहे. आम्ही वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत लवकरच एक मीटिंग घेणार आहोत. आणि लवकरच यावर तोडगा काढण्यात येणार आहे.

**निवृत्ती भालकर** मुख्याधिकारी, नगर पंचायत, नांदगाव खंडेश्वर

---

नांदगाव खंडेश्वर हे शहर तालुक्याचे मुख्य ठिकाण असून मुख्यतः रहदारी व महत्त्वाचे शासकीय कार्यालय अमरावती ते यवतमाळ रोड या भागात असून लोकांची सकाळपासून ते रात्री नऊ पर्यंत गर्दी असते. शहरातील मुख्य रोड वरून यवतमाळ अमरावती व चांदुर रेल्वे कडे वाहतूक जात असून दुचाकी पासून ते हेवी लोड वाहतूक होत असते त्यामुळे वाहतुकीला शिस्त असावी म्हणून व भविष्यात होणारा अपघात टाळावा म्हणून बस स्थानक समोरील मुख्य चौकात वाहतूक सिग्नल असणे गरजेचे आहे. या करीता मी आमच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांना ही बाब सांगितली असून त्याच्या मंजुरीकरिता प्रयत्नशील आहे.

**श्रीराम लांबाडे** पोलीस निरीक्षक, नांदगाव खंडेश्वर

# हसत-खेळत कौशल्यपूर्ण शिक्षणाचा देणार आनंद

### सेतू' अभ्यास पुस्तिका, नव्या सत्रापासून बदलणार तिसरी, चौथी, सहावीचा अभ्यासक्रम

विदर्भ प्रजसत्ताक

**दि.२९अमरावती–** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने शालेय शिक्षणाचा नवा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम 'सेतू' अभ्यास पुस्तिकेद्वारे शिकविला जाणार असून त्याद्वारे हसत-खेळत कौशल्यपूर्ण शिक्षणाचा आनंद दिला जाणार आहे. हा अभ्यासक्रम इयत्ता तिसरी, चौथी व सहावीचा असेल.या नवीन अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तकेही येत्या शैक्षणिक वर्षापासूनच लागू होणार आहेत. सध्या इयत्ता दुसरी, तिसरी व पाचवीतील विद्यार्थी मात्र जुन्या अभ्यासक्रमानुसार शिकत आहेत. त्यामुळे त्यांना नवीन अभ्यासक्रमांशी सहज जुळता यावे व हसत खेळत शिकावे, यासाठी पुण्याच्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) महाराष्ट्र राज्य पुणे यांच्यातर्फे सेतू अभ्यास पुस्तिका तयार केली जात आहे. सध्या राज्याचा शिक्षण विभाग सेतू अभ्यास पुस्तीकेद्वार शिकवण्याची पूर्वतयारी करत आहे. सेतू अभ्यास पुस्तिका मराठी, इंग्रजी, गणित, विज्ञान व सामाजिक शास्त्र या विषयांसाठी तयार केली जाणार आहे.शासनाचे शिक्षणाचे बालवर्ग ते दुसरी असे पूर्वप्राथमिक, तिसरी ते पाचवी हे प्राथमिक आणि सहावी ते आठवी हे माध्यमिक तर नववी ते बारावी उच्च माध्यमिक अशी विभागणी केली आहे. त्यानंतर हळूहळू शैक्षणिक अभ्यास क्रमातही बदल केले जात आहेत. सरावातून विद्यार्थी क्षमतेवर भर देण्याचा पर्याय म्हणून मुलांना छोट्या गोष्टीतून समजावणे, त्यांना जास्त लक्षात राहील असे कौशल्य सराव करणे या मुद्द्यांचा अधिक समावेश या अभ्यास क्रमात करण्यात आला आहे, असे तज्ज्ञ आणि एससीइआर टीच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. हा सेतू अभ्यास दीड महिना चालेल. शैक्षणिकदृष्टया महत्त्वाचा जूनचा अर्धा महिना आणि जुलै असा हा दीड महिना राहील. नवीन अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीपूर्वी विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी हाती घेतलेला हा उपक्रम आहे छायाचित्रांसह साहित्यातून विद्यार्थ्यांना शिकवणार सेतू अभ्यासपुस्तिकेच्या अनुषंगाने मागील वर्षीच एका इयत्तेचा अभ्यासक्रम बदलण्यासंदर्भात अभ्यास मंडळाच्या बैठकीत निर्णय झाला होता. त्यानुसार स्पर्धेत विद्यार्थी टिकावेत, त्यांना सहज गोष्टी समजाव्यात आणि कौशल्य विकास व्हावा, या दृष्टिकोनातून अभ्यासक्रमात बदल केले जात आहेत. ज्यात छायाचित्रांसह आपल्या आसपास असणाऱ्या साहित्यातून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवायचे आहे.

# वाळूतस्कर ट्रक सोडून झाले पसार चालकासह तिघांवर गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अचलपूर –** तालुक्यात अवैध वाळू वाहतूक व तस्करी करणाऱ्यांविरोधात महसूल प्रशासनाने कडक कारवाई केली आहे. परतवाडा शहरातील विदर्भमिल कॉलनी परिसरातील खानझोडे रोडवर रेतीने भरलेला ट्रक तपासणीदरम्यान आढळून आला. तपासणीवेळी संबंधित चालकाने ट्रक घटनास्थळी सोडून पळ काढला.तपासादरम्यान सदर ट्रकवर कोणताही वैध रेती पास नसल्याचे निदर्शनास आले. ही कारवाई २५ जानेवारी रोजी दुपारी दोन वाजताच्या सुमारास करण्यात आली. ट्रक क्रमांक एमएच ०२ सीई ८०४२ असून, सदर वाहन चालक चेतन रामचंद्र मांजरे याच्याकडे तपासणी करण्यात आली असता ट्रकमध्ये बेकायदेशीररीत्या रेती वाहतूक सुरू असल्याचे स्पष्ट झाले. महसूल विभागाने केलेल्या चौकशीत सदर ट्रक गोलू माडे व विवेकी भारत माहुरे यांच्या मालकीचा असल्याचे निष्पन्न झाले. ट्रक तहसील कार्यालयात नेत असताना पावर हाऊसजवळ विवेकी भारत माहरे यांनी वाहन अडवण्याचा प्रयत्न करत माझा भाऊ येईपर्यंत वाहन इथेच थांबेल, असे सांगून वाद घातला. मात्र, प्रशासनाने ठाम भूमिका घेत वाहन ताब्यात अधिकारी अमोल बोकडे यांच्या नेतृत्वाखाली व अमित गायकवाड यांनी केली. घेतले. याप्रकरणी चालक चेतन मांजरे, गोलू माहूरे व विवेकी भारत माहुरे यांच्याविरोधात अवैध वाळू तस्करीप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई मंडळ ग्राम महसूल अधिकारी सुरेंद्र चौधरी, संतोष गेठे, अमित गायकवाड उपस्थित होते

# भातकुली तालुक्यातील ३६ ग्रामपंचायतींवर प्रशासक बसणार

### शासनाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी व सीईओंना निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९टाकरखेडा संभु–** राज्य शासनाने मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्याचे आदेश दिल्याने भातकुली तालुक्यातील एकूण ग्रामपंचायतींपैकी ४८ ३६ ग्रामपंचायतींवर प्रशासक बसविण्यात येणार आहेत. या संदर्भात शासनाने जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना स्पष्ट निर्देश दिले आहेत.

राज्यात ज्या ग्रामपंचायतींची मुदत जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत संपत आहे, तसेच नव्याने स्थापन होणाऱ्या ग्रामपंचायतींवर निवडणूक होईपर्यंत प्रशासक नेमण्याबाबत ग्रामविकास विभागाने २३ जानेवारी रोजी परिपत्रक जारी केले आहे. न्यायालयाच्या ग्रामपंचायतीचा आदेशानुसार, कार्यकाळसंपल्यानंतर नवीन ग्रामपंचायत अस्तित्वात येईपर्यंत प्रशासक नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार संबंधित विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व सीईओ यांनी नियमानुसार प्रशासक नियुक्तीची कार्यवाही करावी, तसेच या प्रक्रियेत उच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे शासनाने स्पष्ट केले आहे.१५ अमरावती जिल्ह्यात फेब्रुवारी रोजी ५५२ ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपत असून, पहिल्या टप्प्यात या सर्व ग्रामपंचायतींवर प्रशासक बसणार आहेत. त्यात भातकुली तालुक्यातील ३६ ग्राम पंचायतींचा समावेश आहे. निवडणुका होईपर्यंत ग्राम पंचायतींचा कारभार प्रशासकांच्या माध्यमातून चालविला जाणार आहे.

# बसपच्या विद्या माटे यांची गटनेतेपदी निवड

### बसपाचा कोणत्याही राजकीय पक्षाला पाठिंबा नाही



**विदर्भ प्रजासत्ताकदि.२९ अमरावती** – राज्य सरकारकडून महापालिका निवडणुकीत विजयी उमेदवारांचे गॅझेट प्रसिद्ध झाल्यानंतर मनपामध्ये गटनेते निवडीसंदर्भातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर बहुजन समाज पार्टनि (बसपा) अमरावती महानगरपालिकेत स्वतंत्र गट स्थापन केला असून, गटनेतेपदी विद्या माटे यांची निवड करण्यात आली आहे.बसपाचे जिल्हाध्यक्ष अजय गोंडाणे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, सध्या बसपाचा कोणत्याही राजकीय पक्षाला पाठिंबा नाही. बसपाचा स्वतंत्र गट स्थापन करून त्यासंदर्भातील अधिकृत प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयात सादर करण्यात आलेला आहे. या गटामध्ये विद्या माटे यांच्यासह इस्माईल लालूवाले आणि सचिन वैद्य यांचा समावेश आहे. हे तिघेही नवनिर्वाचित नगरसेवक फ्रेजरपुरा-रुक्मिणी नगर प्रभाग क्रमांक११ मधून बसपाच्या तिकिटावर निवडून आले आहेत. महापालिकेच्या महापौर, व उपमहापौर पदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांनी गटनेते निवडीची प्रक्रिया गतिमान केली आहे. दरम्यान, बसपाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. सुनील डोंगरे यांनी विद्या माटे यांची बसपा गटनेतेपदी अधिकृत नियुक्ती केली आहे

# अजितदादांचा अपघातच, यात राजकारण आणू नका
## पाणावलेल्या डोळ्यांनी शरद पवारांचे नेत्यांना कळकळीचं आवाहन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ पुणे**

अजित पवार यांच्या अपघातामागे काही राजकारण असल्याच्या भूमिका मांडल्या जात आहेत. पण यात राजकारण नाही. हा निव्वळ अपघात असून या मृत्यू यातन्या महाराष्ट्राला, आम्हा सगळ्यांना आहेत. कृपया यात राजकारण आणू नये, एवढंच सांगायचं आहे, अशी कळकळीची विनंती शरद पवार यांनी केली आहे.

अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर शरद पवार यांनी व्हिडिओ जारी करत प्रतिक्रिया दिली आहे. शरद पवार म्हणाले, 'अजित पवार यांचा अपघाती मृत्यू हा महाराष्ट्राला प्रचंड मोठा धक्का आहे. एक कर्तृत्ववान आणि निर्णय घेण्याची शक्ती ज्यांच्यात आहे अशा व्यक्तीला महाराष्ट्र आज मुकला. जे काही नुकसान झालंय ते भरून निघणारं नाही पण सगळ्याच गोष्टी काही आपल्या हातात नसतात.

'मी आज मीडियासमोर येणार नव्हतो पण काही माध्यमांमध्ये ह्या अपघातामागे काही राजकारण आहे अशा प्रकारची भूमिका कोलकोत्यावरुन मांडली गेली, असं कळलं. पण ह्यात राजकारण नाही हा निव्वळ अपघात आहे. ह्या मृत्यूच्या यातना महाराष्ट्राला, आम्हा सगळ्यांना आहेत', असंही शरद पवारांनी म्हटलंय.

अजित पवार यांच्या निधनाने मला धक्का बसला आहे. या अपघाताच्या घटनेची चौकशी झाली पाहिजे, अशी प्रतिक्रिया तृणमूल काँग्रेसच्या नेत्या आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी व्यक्त केली.सोशल मीडियावर व्यक्त होत ममता बॅनर्जी म्हणाल्या की, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि त्यांच्यासोबत प्रवास करणाऱ्या सहप्रवाशांचा आज सकाळी बारामती येथे झालेल्या भीषण विमान अपघातात मृत्यू झाला आहे, या घटनेमुळे मला अतीव दुःख झाले आहे. अजित पवारांचे काका शरद पवार यांच्यासह त्यांचे कुटुंबीय आणि दिवंगत अजित पवारांचे सर्व मित्र, चाहते, समर्थक यांच्याप्रती माझ्या संवेदना व्यक्त करते. या घटनेची योग्य चौकशी होणे आवश्यक आहे.

तर समाजवादी पक्षाचे अध्यक्ष आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनीही अजित पवार यांच्या निधनावर शोक व्यक्त करत अजित पवारांना श्रद्धांजली अर्पण केली. मात्र या विमान अपघाताची चौकशी झाली पाहिजे, अशीही मागणी अखिलेश यादव यांनी केली. यातील खरे कारण समोर आले पाहिजे, असेही अखिलेश यादव म्हणाले. आपच्या प्रवक्त्यांनीही अशीच मागणी केली होती.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचं ममता बॅनर्जींना प्रत्युत्तर**

'ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी अजित पवारांचा मृत्यू हा निव्वळ अपघात असल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र, दुर्दैवाने राजकारणाची पातळी इतकी खालावली आहे की एखाद्याच्या मृत्यूवरुनही राजकारण केलं जातंय. ममता बॅनर्जींनी इतक्या खालच्या पातळीचं राजकारण सुरू केल्याचं बघून मला वाईट वाटतंय. त्यांनी अशा स्वरुपाचे विधान टाळायला हवे होते', असे फडणवीसांनी म्हटले आहे.

**दुःखावर फुंकर घालण्याचे काम करा- शिंदे**

ममता बॅनर्जींच्या विधानावरुन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनेही टीका केली आहे. 'ही राजकारण करण्याची वेळ नाही. उपमुख्यमंत्र्यांचा मृत्यू झाला आहे. महाराष्ट्र शोक सागरात असून अजित पवारांच्या कुटुंबियांच्या दुःखावर फुंकर घालण्याचे काम केले पाहिजे', असे एकनाथ शिंदेंनी सुनावले आहे.

# हुंदके, भिजलेले डोळे आणि सुन्न शांतता उद्धव ठाकरे बारामतीत
## रश्मी ठाकरेंनी केलं सुनेत्रा पवारांचं सांत्वन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९बारामती**

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा काल (बुधवार २८ जानेवारी) बारमतीजवळ विमान अपघातात मृत्यू झाला. चार सभांसाठी मुंबईहून बारामतील निघालेल्या या विमानात अजित पवारांसह आणखी ४ जणांचा समावेश होता. सकाळी ८ च्या सुमारास मुंबईहून या विमानाने उड्डाण केलं आणि ८.४५ च्या सुमारासा ते बारामतीतील रनवेजवळील एका शेतात धाडकन कोसळलं. खाली पडताच विमानाने पेट घेतला आणि ३-४ मोठे स्फोट झाले, आग लागील. यामुळे कोणीही वाचण्याची शक्यता उरली नाही. या अपघातामध्ये अजित पवार यांच्यासह त्यांचे वैयक्तिक सुरक्षा रक्षक विदीप जाधव, विमानाचे पायलट कॅप्टन सुमित कपूर, को-पायलवट शांभवी पाठक आणि फ्लाइट अटेंडंट पिंकी माली या पाचही जणांचा मृत्यू झाला.

दरम्यान शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हेही काल रात्री बारामतीमध्ये पोहोचले. त्यांच्यासह पत्नी रश्मी ठाकरे व मुलगा आदित्य ठाकरे हे देखील उपस्थित होते. बारामतीमधील निवासस्थानी जाऊन उद्धव यांनी दादांचं अंतिम दर्शन घेतलं. सुनेत्रा पवार व दादांच्या कुटुंबियांची भेट घेऊन उद्धव , रश्मी व आदित्य ठाकरे यांनी त्यांचं सांत्वन केलं. यावेळी वातावरण अगदी सुन्न होतं, पवार कुटुंबियांचे भरलेले डोळे, हुंदके पाहून सर्वच गहिवरले. सुनेत्रा पवारांचं ांत्वन करताना रश्मी ठाकरेही गहिवरल्या.

# अजितदादांच्या निधनाचं वृत्त कळताच जरांगे पाटील बारामतीमध्ये

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९बारामती**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला आज अपघात झाला, ते मुंबईवरून बारामतीकडे निघाले होते. विमान धावपट्टीवर उतरत असतानाच नियंत्रण सुटलं आणि विमान जमिनीला धडकलं, विमान जमिनीला धडक्यानंतर मोठा स्फोट झाला आणि विमानाने पेट घेतला. या अपघातामध्ये अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला आहे. अजित पवार यांच्या निधनाने संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे. अजित पवार यांच्या निधनाचं वृत्त कळताच कार्यकर्त्यांनी बारामतीमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे. अनेक नेते देखील बारामतीमध्ये दाखल झाले आहेत. दरम्यान अजित पवार यांच्या निधनाचं वृत्त कळताच मनोज जरांगे पाटील देखील बारामतीमध्ये दाखल झाले आहेत. अजित पवार यांच्या विमान अपघातावर प्रतिक्रिया देताना ते चांगलेच भावुक झाल्याचं पहायला मिळालं.



सगळ्यांना राज्यातील गोरगरिबांना अजित पवार आधार द्यायचे, आता ते आम्हाला कधी पहायला मिळणार नाही. दादा गेले हे खूप मोठं नुकसान आहे. राज्यात देशात आता अजित पवार यांच्यासारखा दुसरा नेता पुन्हा होणार नाही. आम्ही अशा दुःखाच्या प्रसंगी त्याच्यासोबत आहोत. त्यांच्या कुटुंबाची भेट घेतली, हे दुःख नाही बघवत. काय बोलावं काहीच कळत नाही. अजितदादादा म्हणजे या राज्याला फार मोठा आधार होता. अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली, त्यांना श्रद्धांजली वाहताना शब्द देखील फुटत नाहीयेत. दादा आपल्यात नाहीत, यावर अजूनही विश्वास बसत नाही. आज आमच्या समाजाचा, राज्याचा, राज्यातील जनतेला फार मोठा आधार गेला आहे. अजितदादा स्पष्ट बोलायचे, आता पुन्हा हे कधी पहायला मिळणार नाही, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.दरम्यान अजित पवार यांच्या विमान अपघातावर शरद पवार यांची देखील प्रतिक्रिया समोर आली आहे, हा निव्वळ एक अपघात होता, यामध्ये राजकारण नाही. अजित पवार यांच्या निधनामुळे महाराष्ट्राचं जे नुकसान झालं आहे, ते कधीही भरून निघणार नाही, असं यावेळी शरद पवार यांनी म्हटलं आहे.

# श्री सरयूपारीण ब्राह्मण सभा आयोजित खिचडी भोज व पदग्रहण समारंभ उत्साहात संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

श्री सरयूपारीण ब्राह्मण सभेच्या वतीने उत्तरायणाच्या पावन पर्व मकरसंक्रांतीच्या शुभमुहूर्तावर वार्षिक सर्वसाधारण सभा, खिचडी भोज, महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम तसेच नवनियुक्त महिला मंडळ व युवा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ मंगसाजी सभागृह, अमरावती येथे मागील रविवारी अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.हा कार्यक्रम सभेचे अध्यक्ष डॉ. सतीश तिवारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. यावेळी संरक्षक श्री शारदाप्रसाद तिवारी, उपाध्यक्ष श्री रुपेश तिवारी, सचिव डॉ. मनीष दुबे, सहसचिव श्री राजेंद्र पांडे, कोषाध्यक्ष ड. आशीष त्रिपाठी, सदस्य श्री वीरेंद्र तिवारी, श्री कृष्णदेव तिवारी, श्री शाकाल तिवारी, महिला मंडळ अध्यक्षा श्रीमती मधु त्रिपाठी तसेच युवा परिषद अध्यक्ष श्री अवधेश मिश्रा आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते.वार्षिक सर्वसाधारण सभेची प्रस्तावना व




सूत्रसंचालन सचिव डॉ. मनीष दुबे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री अभिषेक तिवारी यांनी मानले. सभेत प्रस्तावित सभागृह बांधकाम, मागील वर्षाचा कार्यवृत्तांत, उत्पन्न-खर्चाचा तपशील तसेच आगामी सामाजिक उपक्रमांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. उपस्थित समाजबांधवांनी विविध विषयांवर आपले विचार मांडले.या प्रसंगी नवनियुक्त महिला मंडळ व युवा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन विधिवत पदग्रहण करण्यात आले. महिला मंडळाच्या वतीने महिलांसाठी पारंपरिक पद्धतीने हळदी-कुंकू, उखाणे स्पर्धा तसेच बालगोपाळांसाठी सामूहिक लूट यांसारख्या आकर्षक कार्यक्रमांचे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले. सर्वांनी या कार्यक्रमांचा मनसोक्त आनंद घेतला.अध्यक्षीय भाषणात डॉ. सतीश तिवारी यांनी सामाजिक एकतेला समाजाच्या प्रगतीचा कणा असल्याचे सांगितले. अशा सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमुळे समाजात परस्पर सहकार्य व समरसता वृद्धिंगत होते, असे त्यांनी नमूद केले. नवनियुक्त कार्यकारिणीचे अभिनंदन करत त्यांनी सर्वांना यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीमती मधु त्रिपाठी, श्रीमती सरोज तिवारी, श्रीमती शर्मिला मिश्रा, श्रीमती शारदा पांडे, श्रीमती सारिका तिवारी, श्रीमती छाया मिश्रा, श्रीमती निशा दुबे, श्रीमती सुषमा मिश्रा, श्रीमती स्वाती त्रिपाठी, श्रीमती श्रद्धा चौबे, श्रीमती नीता मिश्रा, श्रीमती प्रीती दुबे, श्रीमती निकिता तिवारी, श्रीमती गीता मिश्रा, डॉ. उषा तिवारी, श्रीमती शीला तिवारी, डॉ. आशा पांडे, श्रीमती मंगला शुक्ला, श्रीमती सरस्वती मिश्रा, श्रीमती निधी मिश्रा, श्रीमती सारिका मिश्रा, निर्मला ओझा, श्रीमती किरण मिश्रा, श्रीमती निशा मिश्रा, श्रीमती मीना मिश्रा, श्रीमती राधा मिश्रा, दीपाली त्रिपाठी यांच्यासह श्री मनोज त्रिपाठी, श्री राकेश मिश्रा, श्री प्रमोद मिश्रा, श्री सुशील दुबे, श्री प्रदीप पांडे, श्री अटल मिश्रा, श्री अवधेश मिश्रा, श्री अमित तिवारी, श्री विकास पांडे, श्री मनीष त्रिपाठी, श्री हिमांशु तिवारी, श्री अभिषेक तिवारी, श्री अमित मिश्रा, श्री नीरज मिश्रा, श्री सौरभ मिश्रा, श्री रोहित तिवारी, श्री नितेश तिवारी, श्री हर्ष मिश्रा यांनी विशेष प्रयत्न केले.कार्यक्रमास श्री देवराज तिवारी, श्री अनिरुद्ध तिवारी, श्री हरिराज तिवारी, डॉ. महेंद्र त्रिपाठी, श्री रामसजीवन दुबे, श्री प्रेमकुमार तिवारी, श्री शैलेंद्र मिश्रा, श्री शिवमोहन उपाध्याय, ड. सतीश उपाध्याय, श्री राजेश तिवारी, श्री अनिल मिश्रा, नरेंद्र पांडे, राजेश त्रिपाठी, श्री सी. पी. दुबे, श्री उमेश पांडे, श्री संतोष मिश्रा, श्री शरदचंद्र तिवारी, श्री जुगलकिशोर ओझा, श्री उमेशनाथ द्विवेदी, श्री अवधेश तिवारी, श्री अनिकेत मिश्रा, श्री राजेश दुबे, श्री आशीष त्रिपाठी, संतोष त्रिपाठी, श्री जवाहर तिवारी यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.


# मनपा आयुक्तांची शहरातील विविध ठिकाणी साफसफाई व अतिक्रमणाबाबत प्रत्यक्ष पाहणी
## स्वच्छता, कचरा व्यवस्थापन व अतिक्रमणाबाबत कठोर निर्देश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

शहर स्वच्छ, सुंदर व नागरिकांसाठी सुरक्षित राहावे यासाठी अमरावती महानगरपालिका सातत्याने उपाययोजना करीत असून, त्या अनुषंगाने आज अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी शहरातील शुक्रवार बाजार, सुंदरलाल चौक, शुक्रवार बाजारातील मटन मार्केट, महादेवखोरी तसेच ऑक्सिजन पार्क या महत्त्वाच्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली.या पाहणीदरम्यान आयुक्तांनी परिसरातील स्वच्छता स्थिती, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक जागांवरील अतिक्रमण तसेच नागरिकांच्या सोयी-सुविधांचा आढावा घेतला. संबंधित विभागांचे अधिकारी, आरोग्य विभागाचे कर्मचारी व स्वच्छता निरीक्षक यांच्याशी त्यांनी सविस्तर चर्चा करून आवश्यक त्या सूचना व स्पष्ट निर्देश दिले.शहरातील सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या नागरिकांमुळे अस्वच्छता वाढत असल्याचे निदर्शनास आल्याने, अशा प्रकारे कचरा टाकणाऱ्यांवर कोणतीही तडजोड न करता कठोर कारवाई करण्यात यावी, असे स्पष्ट आदेश आयुक्तांनी दिले. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करून स्वच्छतेबाबत जनजागृती वाढविण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.विशेषतः शुक्रवार बाजारातील मटन मार्केट परिसरात अतिक्रमणामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचे लक्षात घेता, सदर ठिकाणी असलेले अनधिकृत अतिक्रमण तात्काळ हटविण्याचे निर्देश आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. भविष्यात पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी नियमित तपासणी व प्रभावी नियंत्रण ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.महादेवखोरी व ऑक्सिजन पार्क परिसरात स्वच्छता राखण्याबरोबरच नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या सार्वजनिक जागा सुस्थितीत ठेवण्यावर भर देण्यात आला. शहरातील प्रत्येक परिसर स्वच्छ, अतिक्रमणमुक्त व पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी महानगरपालिका प्रशासन कटिबद्ध असल्याचे आयुक्तांनी यावेळी सांगितले.शहर स्वच्छता अभियान यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये व नियमांचे पालन करावे, असे आवाहनही आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी यावेळी केले.या पाहणी दरम्यान वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक कुंदन हडाले, स्वास्थ निरीक्षक, कोणार्क कंपनीचे प्रतिनिधी, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# अर्थसंकल्पाआधीच दादांची 'एक्झिट'
## अकाली मृत्यू झाल्याने अधिकाऱ्यांमध्येही हळहळ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मुंबई**

मार्चच्या पहिल्या आठवड्यात राज्याचा अर्थसंकल्प सादर होणार आहे. अर्थमंत्रिपदाची धुरा सांभाळणारे अजित पवार स्थानिक निवडणुकांत व्यग्र असले, तरी वित्त विभागातील संबंधित अधिकाऱ्यांशी त्यांचा सातत्याने संवाद सुरू होता. महापालिका निवडणुका संपल्यानंतर त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांची एक बैठकही घेतली होती. मात्र, अर्थसंकल्प सादर करण्याआधीच त्यांचा अकाली मृत्यू झाल्याने अधिकाऱ्यांमध्येही हळहळ व्यक्त होत आहे.

दहा मार्च २०२५ रोजी अकराव्यांदा त्यांनी अर्थसंकल्प मांडून आधीचे त्यांचे सहकारी जयंत पाटील यांचा दहा वेळा अर्थसंकल्प मांडण्याचा विक्रम मोडीत काढला होता. त्यानंतर सरकारची आणखी चार वर्षे शिल्लक असल्याने अजित पवार निर्विवादपणे बॅ. शेषराव वानखेडे यांचा १३ वेळा अर्थसंकल्प मांडण्याचा विक्रम मोडून नवीन विक्रम प्रस्थापित करणार याबद्दल खात्री व्यक्त केली जात होती. मात्र, पवार यांच्या अकाली निधनाने तो विक्रम हुकलाच.

**सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प मांडणारे मंत्री**

बॅ. शेषराव वानखेडे -१३ वेळा
अजित पवार -११ वेळा
जयंत पाटील -१० वेळा
सुशीलकुमार शिंदे -९ वेळा

# चांदूर बाजार सुपुत्र डॉ. मोहन दहिकर यांना राष्ट्रपती पदक जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९चांदुर बाजार**

सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तथा चांदुर बाजार येथील माजी शिक्षक मुरलीधराव दहिकर याचे सुपुत्र डॉ. मोहन दहिकर यांना त्यांच्या उत्कृष्ट, निष्ठावान व उल्लेखनीय सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर करण्यात आले आहे.

देशपातळीवर दिल्या जाणाऱ्या या मानाच्या पुरस्कारामुळे सिंधुदुर्ग पोलीस दलासह अमरावती जिल्ह्यात सर्वत्र समाधान व अभिमान व्यक्त केला जात आहे.सन २००२ मध्ये उपअधीक्षक म्हणून महाराष्ट्र पोलीस दलात रुजू झालेल्या डॉ. दहिकर यांनी आपल्या दीर्घ सेवाकाळात कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. सेवेच्या प्रारंभी वरोरा व नागपूर ग्रामीण येथे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून काम करताना त्यांनी शिस्त, पारदर्शकता आणि प्रभावी पोलिसिंगची ओळख निर्माण केली. अतिरिक्त पोलीस अधीक्षक पदावर जालना येथील पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य म्हणून




कार्यरत असताना त्यांच्या सक्षम प्रशासनामुळे त्या केंद्राला खडज प्रमाणपत्र प्राप्त झाले. मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयात पोलीस उपायुक्त (वाहतूक), झोन १० व झोन ११ येथे कार्यरत असताना गुन्हे अन्वेषण, अंडरवर्ल्डमधील फरारी आरोपींचे प्रत्यार्पण तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्याचे अत्यंत जबाबदारीचे काम त्यांनी यशस्वीपणे पार पाडले.मुंबई दहशतवाद विरोधी पथकात कार्यरत असताना अनेक दहशतवादी टोळ्यांचा पर्दाफाश करून त्यांनी राष्ट्रीय सुरक्षेला बळकटी दिली. सांप्रदायिकदृष्ट्या संवेदनशील असलेल्या भिवंडी शहराचे पोलीस उपायुक्त म्हणून काम करताना धार्मिक सहिष्णुतेला प्राधान्य देत २०२४ मधील विधानसभा निवडणूक शांततेत पार पाडून आपली नेतृत्व क्षमता सिद्ध केली. सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असताना त्यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण, नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे तसेच पोलीस दलात शिस्त व कार्यक्षमता वाढविण्यावर विशेष भर दिला. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गुन्हे उघडकीस आणणे, सायबर गुन्ह्यांवर लक्ष केंद्रीत करणे, महिला व बालकांच्या सुरक्षेसाठी उपक्रम राबवणे आणि जनतेशी सुसंवाद साधणारी पोलिसिंग ही त्यांच्या कार्यशैलीची वैशिष्ट्ये ठरली. लोकांसाठी सहज उपलब्धता, ठाम व संवेदनशील नेतृत्व आणि सखोल कायदेशीर ज्ञान ही त्यांची ओळख आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत २०१९ मध्ये पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह त्यांना प्रदान करण्यात आले होते. आता राष्ट्रपती पदक जाहीर झाल्याने चांदूर बाजारच्या सुपुत्राने अमरावती व सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# भाजप गटनेत्याची धुरा माजी महापौर चेतन गावंडे यांच्या खांद्यावर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

नुकतीच पार पडलेल्या अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी महापौर चेतन गावंडे यांना भाजपने नवी जबाबरी दिली आहे. त्यांना अमरावती महानगरपालिका भाजपच्या गटनेता पदी निवड करण्यात आली आहे.

भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत हा निर्णय घेण्यात आला या वेळी

अमरावती मनपा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे २५ नगरसेवक निवडून आले असून,गटनेता या पदासाठी अमरावती माजी महापौर तथा साईनगर अकोली येथील नगरसेवक चेतन गावंडे यांच्या नावावर सर्वांचे एकमत झाले.

श्री गावंडे यांचा प्रशासकीय कामाचा अनुभव , दांडगा जनसंपर्क आणि पक्षाप्रती असलेली निष्ठा लक्षात घेऊन ही जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.चेतन गावंडे यांनी यापूर्वीही महापौर , शिक्षण सभापती , अमरावती महानगरपालिका स्थायी समिती सदस्य , अमरावती जिल्हा नियोजन समिती सदस्य तसेच भाजप पक्ष संघटनेत महत्त्वाची पदे भूषवली आहेत. या निवडीवेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ.नितीन धांडे आमदार आणि शहरातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

भारतीय जनता पक्ष अमरावती महानगरपालिका गटनेते पदी माझी नियुक्ती करण्यात आली. नागरिकांचे प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी मी सदैव कटीबद्ध आहे. पक्षातील वरिष्ठांनी माझ्यावर दिलेल्या ह्या नवीन जबाबदारीला व विश्वासाला पूर्ण क्षमतेने न्याय देण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करणार आहे. पक्षातील सहकाऱ्यांची साथ माझ्या पाठीशी सदैव आहे व पुढेही राहील याची मला खात्री आहे. ही सर्व ऊर्जा घेवुन यापुढेही जोमाने काम करण्याचा निश्चय केला आहे .सबका साथ , सबका विश्वास सबका प्रयास या सूत्रावर येणाऱ्या दिवसात काम करू असे, श्री गावंडे यांनी म्हटले आहे.

# ज्येष्ठ नागरिकांचा प्रवास पुन्हा 'स्वस्त' होणार? बजेट २०२६ मध्ये रेल्वे सवलत सुरू करण्याचे संकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

येत्या १ फेब्रुवारी रोजी सादर होणाऱ्या अर्थसंकल्प २०२६ मध्ये केंद्र सरकार ज्येष्ठ नागरिकांसाठी एक मोठी घोषणा करण्याची शक्यता आहे. कोरोना महामारीच्या काळापासून बंद करण्यात आलेली रेल्वे तिकिट सवलत पुन्हा बहाल करण्याबाबत रेल्वे मंत्रालय आणि वित्त मंत्रालयामध्ये सकारात्मक चर्चा सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. या निर्णयामुळे ६० वर्षांवरील पुरुष आणि ५८ वर्षांवरील महिला प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.




**कोविड काळातील बंदी आणि रेल्वेचा युक्तिवाद**

मार्च २०२० मध्ये कोरोना संकट ओढवल्यानंतर रेल्वेने ज्येष्ठ नागरिकांना मिळणारी सवलत तात्पुरती स्थगित केली होती. रेल्वेवर दरवर्षी या सवलतीमुळे १,६०० ते २,००० कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडतो, असा युक्तिवाद करत ही सुविधा बंदच ठेवण्यात आली होती. मात्र, आता रेल्वेचे उत्पन्न वाढल्याने ही सवलत पुन्हा सुरू करण्याची मागणी जोर धरत आहे.

**सवलतीचे स्वरूप कसे होते?**

कोविडपूर्वी रेल्वेकडून ज्येष्ठ नागरिकांना खालीलप्रमाणे सवलत दिली जात असे.

पुरुष (६० वर्षांवरील) : तिकीट दरात ४०% सूट.

महिला (५८ वर्षांवरील) : तिकीट दरात ५०% सूट.

लागू श्रेणी : स्लीपर क्लासपासून ते फर्स्ट एसीपर्यंतच्या (३-ए, २-ए, १-ए) सर्व श्रेणींमध्ये ही सवलत मिळत असे.

**बजेट २०२६ कडून काय आहेत अपेक्षा?**

सूत्रांच्या माहितीनुसार, आगामी अर्थसंकल्पात या सवलतीची घोषणा होऊ शकते. काही प्रस्तावांमध्ये ही सवलत केवळ स्लीपर आणि ३-टियर एसी पुरती मर्यादित ठेवण्याचाही विचार सुरू आहे, जेणेकरून रेल्वेवर जास्त आर्थिक बोजा पडणार नाही. मात्र, सर्वच वर्गातील ज्येष्ठांना पूर्वीप्रमाणे सवलत मिळावी, अशी मागणी जोर धरत आहे.

**ज्येष्ठांसाठी ही सवलत का महत्त्वाची?**

अनेक ज्येष्ठ नागरिक तीर्थयात्रा किंवा मुलांकडे जाण्यासाठी रेल्वेचा वापर करतात. वाढत्या महागाईच्या काळात निवृत्तीवेतनावर अवलंबून असणाऱ्या ज्येष्ठांसाठी ही सवलत केवळ आर्थिक मदत नसून, त्यांच्या सन्मानजनक प्रवासासाठी आवश्यक मानली जाते. विशेषतः लांब पल्ल्याच्या प्रवासात ५० टक्क्यांपर्यंतची सूट प्रवासाचा खर्च निम्म्याने कमी करते.

# आ.सुलभाताई खोडके यांच्या जनसंपर्क कार्यालय येथील शोकसभेत अजितदादांना श्रद्धांजली

## अंत्यसंस्काराचे थेट प्रक्षेपण पाहतांना कार्यकर्ते भावुक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**


जानेवारी - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा.नामदार- श्री अजितदादा पवार यांचे काल बुधवार दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी विमान अपघतात दुःखद निधन झाले . या निधनाने महाराष्ट्र हळहळला असून सर्वत्र शोक व्यक्त केल्या जात आहे. अजितदादांच्या निधनाबद्दल अमरावती मध्ये सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस परिवारात दुखवटा पसरला असून कार्यकर्त्यांना अश्रू अनावर झाले आहेत. अजितदादा पवार यांच्या निधनाचे वृत्त कळताच अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई खोडके,आ. संजय खोडके व यश खोडके बारामतीत दाखल झाले असून शहरातील प्रमुख पदाधिकारी सुद्धा अंत्यदर्शनासाठी पोहोचले आहेत. आज गुरुवार दिनांक २९ जानेवारी रोजी स्व. अजितदादा पवार यांच्यावर बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अजितदादांना अखेरचा निरोप देण्यासाठी जनसागर लोटला होता.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते स्व. अजितदादा पवार यांच्या अंत्यसंस्काराचे दर्शन करता यावे म्हणून अमरावती येथील आ.सौ. सुलभाताई खोडके यांच्या अमरावती मध्यवर्ती बसस्थानक ते रेल्वे स्टेशन मार्ग चौक स्थित जनसंपर्क कार्यालय येथे एलईडी स्क्रीन वरून प्रसारण करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस परिवार शोकसागरात बुडाला होता. सर्वांच्या चेहऱ्यावर आपल्या लाडक्या नेत्याचे अंत्यदर्शन होण्याचा दुःखमय भाव प्रकट होत होता. जेव्हा स्व. अजितदादांना मुखाग्नी देण्यात येत होता, त्यावेळी अनेकांच्या डोळयांच्या कडा यावेळी पाणावल्या होत्या. याप्रसंगी स्व. अजितदादा पवार यांची प्रतिमा ठेवून माल्यार्पण करण्यात आल्या नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्व सहकारी, समर्थक तसेच शहरवासियांनी पुष्पअर्पण करून स्व. अजितदादा पवार यांना आदरांजली वाहिली तसेच यावेळी दोन मिनिटे मौन धारण करून सुद्धा श्रद्धांजली अर्पण केली.सर्व शोकाकुल उपस्थितांना अश्रू अनावर झाले होते.

# सायतजवळ काळजाचा थरकाप उडवणारा अपघात

## २ कारची टक्कर, चौघांचा मृत्यू, एक गंभीर दोन्ही कारचा समोरील भाग चकनाचूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ भातकुली**



भातकुली रोडवरील सायत गावाजवळ झालेल्या भीषण अपघातात चार जण ठार तर एक गंभीर जखमी झाला. बुधवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास सायत येथील मानकर ढाब्यासमोर हा अपघात झाला. भातकुली-दर्यापूर रस्त्यावर एक हायस्पीड आय-टेन आणि एक होंडा सिटी कारची समोरासमोर टक्कर झाली. धडक इतकी जोरदार होती की दोन्ही कारच्या समोरील भागाचा पूर्णतः चुराडा झाला. या अपघातात दोघांचा घटनास्थळी तर दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. भातकुली पोलिसांनी चौघांच्याही अपघाती मृत्यूला दुजोरा दिला आहे.

सायत हे गाव भातकुली ते दर्यापूर मार्गावर असून अमरावती पासिंगची कार व अन्य एक कार भरधाव वेगामध्ये समोरासमोर धडकल्या. या भीषण धडकेमध्ये दोन्ही कारमधील चौघे जण मृत्युमुखी पडले. यातील दोघे अन्य करमधील तर दोघे जण अमरावती पासिंगच्या कारमध्ये होते. घटनास्थळी भातकुलीचे ठाणेदार राजूरा जुलवार व त्यांचे पथक पोहोचले असून गंभीर जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये हलविण्यात आले आहे.

मृतांमध्ये मुकुंद काळे (५०, यशोदानगरअमरावती), गोपाल राजपुरोहित (२८,, रा. भातकुली), प्रेम बिष्णोई (रा. जोधपूर, राजस्थान) व जुनेद यांचा समावेश असल्याचे स जिल्हा सामान्य रुग्णालयीन प्रशासनाने द सांगितले. जुनेद व मुकुंद काळे हे एका कारमध्येहोते तर जुनेद हा कार चालवत असल्याचे समोर आले आहे. जखमीला जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविले दोघांचा घटनास्थळी तर दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.

**जिल्हा रुग्णालयात नातेवाईकांची गर्दी**

अपघाताच्या वेळी मुकुंद काळे आणि त्यांचा चालक जुनैद खान हे एकाच कारमध्ये होते. मुकुंद काळे हे साई नगर परिसरात कृष्ण अर्पण नावाचे गॅरेज चालवत होते. दुसऱ्या कारमध्ये असलेले प्रेम आणि गोपाल हे भातकुली येथील बिकानेर मिठाईच्या दुकानात कारागीर म्हणून काम करतहोते. अपघातानंतर, चारही मृतांचे मृतदेह जिल्हा रुग्णालयात आणण्यात आले, जिथे नातेवाईकांची मोठी गर्दी जमली होती, ज्यामुळे एकच गोंधळ उडाला होता. पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे आणि अपघाताचे कारण तपासण्यास सुरुवात केली आहे.सुसाट वेग हे प्राथमिक कारण असल्याचे मानले जात आहे.

# अमरावती महानगरपालिकेत युवा स्वाभिमान पार्टीचा अधिकृत गट स्थापन; प्रा. नाना (ज्ञानेश्वर) आमले गटनेते



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

आमदार रवी राणा यांच्या निर्देशानुसार अमरावती महानगरपालिकेत युवा स्वाभिमान पार्टीचा अधिकृत गट स्थापन करण्यात आला असून, गटनेतेपदी प्रा. नाना उर्फ ज्ञानेश्वर आमले यांची निवड करण्यात आली आहे.या संदर्भात युवा स्वाभिमान पार्टीचे १५ नगरसेवक विभागीय आयुक्त कार्यालयात उपस्थित राहून गट स्थापनेची अधिकृत प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी, नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवण्यासाठी तसेच महापालिकेत प्रभावी व सकारात्मक भूमिका बजावण्यासाठी हा गट कार्यरत राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.आमदार रवी राणा यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेतील पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यात आली असून, शहरहिताच्या निर्णयांमध्ये ठाम भूमिका घेण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. आगामी काळात अमरावतीच्या विकासासाठी युवा स्वाभिमान पार्टीचा गट सक्रिय राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.यावेळी गटनेते प्रा. नाना आमले यांच्यासह नगरसेवक प्रा. प्रशांत वानखडे, नगरसेविका सुमती ढोके, नगरसेवक सचिन भेंडे, अजय जयस्वाल, किशोर जाधव, दीपक साहू, सम्राट महेश मूलचंदानी, योगेश विजयकर, प्रियंका पाटणे, अर्चना पांडे, नंदा सावदे, प्रीती रेवणे, रजनी डोंगरे, गौरी मेघवानी तसेच युवा स्वाभिमान पार्टीचे विनोद जायलवाल, विनोद गुहे, हर्षल रेवणे, अवी काळे, नितीन म्हस्के, भूषण पाटणे, शिवम भिंडा, पंकज शर्मा आदी उपस्थित होते.

# मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची शहरी आरोग्यवर्धिनी केंद्रास भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**



बुधवार, दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी शहरी आरोग्यवर्धिनी केंद्र, रुक्मिणी नगर येथे सविस्तर भेट देऊन केंद्रातील आरोग्यविषयक कामकाजाचा सखोल आढावा घेतला.या भेटीदरम्यान आयुक्त महोदयांनी केंद्रामार्फत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या प्राथमिक व प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांची माहिती घेतली. केंद्रामध्ये नियमितपणे राबविण्यात येणाऱ्या लसीकरण सत्रांबाबत सविस्तर चर्चा करून बालक, माता व गर्भवती महिलांसाठी आवश्यक असलेल्या विविध लसींचा पुरवठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे की नाही, याची प्रत्यक्ष पाहणी करून खात्री केली. लसींचा साठा, वितरण व्यवस्था व नोंदणी प्रक्रियेची तपासणी करताना त्यांनी सर्व कामकाज नियमानुसार व वेळेत करण्याच्या सूचना दिल्या.तसेच आयुक्त महोदयांनी केंद्रातील औषधी साठा व औषधी पुरवठा व्यवस्थेबाबत माहिती घेतली. आवश्यक व अत्यावश्यक औषधे पुरेशा प्रमाणात उपलब्ध ठेवण्याबाबत तसेच औषध वितरण करताना गुणवत्ता व पारदर्शकता राखण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले. शहरी आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये कोणकोणत्या स्वरूपाचे आरोग्यविषयक उपक्रम, तपासण्या व उपचार सेवा दिल्या जातात, याची सविस्तर माहिती त्यांनी घेतली.भेटीदरम्यान केंद्रातील स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन तसेच परिसरातील एकूणच स्वच्छतेचा आढावा घेण्यात आला. केंद्र स्वच्छ, नीटनेटके व नागरिकांसाठी सुरक्षित राहील याबाबत आयुक्त महोदयांनी विशेष भर दिला.यावेळी आयुक्त महोदयांनी शहरी आरोग्यवर्धिनी केंद्रातील सर्व डॉक्टर, नर्सिंग स्टाफ व कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवांचे कामकाज अधिक प्रभावी, वेळेत व संवेदनशीलतेने पार पाडण्याबाबत मार्गदर्शन केले. नागरिकांशी संवाद साधताना सौजन्य, आपुलकी व सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आरोग्य सेवा देण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.याशिवाय महानगरपालिकेमार्फत नव्याने तयार करण्यात आलेल्या पोर्टा केबिनद्वारे सुरू करण्यात येणाऱ्या शहरी आरोग्यवर्धिनी केंद्रांचीही आयुक्त महोदयांनी आढावा घेतला. सदर केंद्रांमधील आवश्यक सोयी-सुविधा, अंतर्गत रचना व कामकाजाची तयारी तपासून संबंधित अधिकाऱ्यांना या केंद्रांचे कामकाज तात्काळ सुरू करण्याचे आदेश देण्यात आले, जेणेकरून नागरिकांना त्यांच्या परिसरातच सुलभ व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होतील.सदर भेटीदरम्यान वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, डॉ. संदीप पाटबागे, शहरी आरोग्यवर्धिनी केंद्र रुक्मिणी नगर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. माधवी वानखडे, स्टाफ नर्स बबीता इंगळे, चतुर्थश्रेणी कर्मचारी श्री. ठाकरे तसेच केंद्रातील इतर कर्मचारी उपस्थित होते.

# परतवाडा शहरात खिरणी बाग येथे भव्य सुन्नी इज्तेमा व जश्ने दस्तारबंदीचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अचलपूर**



परतवाडा शहरात अहले सुन्नत जमात यांच्या वतीने एक दिवसीय वार्षिक सुन्नी इज्तेमा तसेच जश्ने दस्तारबंदी या भव्य धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, ८ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडणार असून, या आयोजनामुळे परतवाडा शहरासह संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.हा कार्यक्रम खिरणी बाग, परतवाडा येथील जामिया अहले सुन्नत गरीब नवाज परिसरात आयोजित करण्यात येणार आहे. इज्तेमाची सुरुवात सकाळी ११ वाजता होईल, तर कार्यक्रम रात्री १० वाजेपर्यंत चालणार आहे.नामवंत उलेमा व मशायखांची उपस्थितीया सुन्नी इज्तेमाच्या सरपरस्तीचे दायित्व प्रसिद्ध इस्लामी विद्वानहजरत सय्यद मस्रूफ अली साहब नूरी (बदायूं शरीफ) सांभाळणार आहेत.कार्यक्रमाची सदारतहाजी मुफ्ती हफीजुल्लाह खान साहब (मुफ्ती-ए-आझम मराठवाडा) यांच्या हस्ते होणार आहे.विशेष अतिथीया कार्यक्रमासाठीहजरत सय्यद शाकरहुसैन रजवी सैफी मिस्बाही,सदर, शोबा-ए-इफ्ता, दारुल उलूम महबूब सुब्हानी, कुर्ला (मुंबई) यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.प्रमुख वक्त्यांचे मार्गदर्शनया इज्तेमामध्ये देशातील प्रसिद्ध इस्लामी आलिम व ख्यातनाम खतीबहजरत अल्लामा मुफ्ती साहब आपल्या प्रभावी व प्रेरणादायी भाषणातून उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.जश्ने दस्तारबंदीचा धार्मिक सोहळाकार्यक्रमादरम्यान जश्ने दस्तारबंदी आयोजित करण्यात येणार असून, दीन-ए-इस्लामचे शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची दस्तारबंदी करून त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. या सोहळ्यामुळे धार्मिक शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित होणार आहे.महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्थाइज्तेमाच्या कालावधीत ख्वातीन (महिलांसाठी) स्वतंत्र व सुसज्ज व्यवस्था करण्यात आली आहे. महिलांचा इज्तेमा सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत होणार असून, बाहेरून येणाऱ्या मौलेमात (महिला वक्त्या) यांचाही सहभाग राहणार आहे.आयोजक व आवाहनया भव्य धार्मिक कार्यक्रमाचे आयोजननवजवानाने अहले सुन्नत तसेचअराफिक जामिया अहले सुन्नत गरीब नवाज, परतवाडा-अचलपूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.आयोजकांनी अचलपूर, परतवाडा व परिसरातील सर्व मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
विदर्भ प्रजासत्ताक
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत